जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


# नगर व भिंगारमध्ये घरफोड्या करणारी टोळी पकडली; ४ संशयित आरोपी ताब्यात

नगर – नगर शहर व भिंगार परिसरात मागील काही दिवसांत घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे. या प्रकरणात एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली असून दोन पसार आरोपींचा शोध सुरू आहे.

याबाबत ची माहिती अशी की, केवळकुमार भगवानदास गांधी (वय ५७, रा. सारसनगर, अहिल्यानगर) हे ३ जुलै रोजी बाहेरगावी गेले असता त्यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केली होती. याप्रकरणी त्यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यासह अहिल्यानगर शहरात उघड न झालेले घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक तयार करण्यात आले.

तपासात गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे धुळे जिल्ह्यातील सोनगीर येथून कैलास चिंतामण मोरे (वय ४४) व जयप्रकाश राजाराम यादव (वय ३८) यांना ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान त्यांनी विरेंद्रसिंग रामकेवलसिंग ठाकुर (रा. हाथगवा, ता. पुंडा, जि. प्रतापगड, उत्तरप्रदेश) व सोपान पाटील (पूर्ण नाव माहिती नाही, रा. वणी, ता. जि. धुळे) यांच्या मदतीने अहिल्यानगर येथे घरफोडी केल्याची कबुली दिली.

दरम्यान चोरीच्या दागिन्याबाबत ताब्यात घेतलेल्या संशयितांकडे चौकशी केली असता चोरी केलेले दागिने रवींद्र आनंद माळी (वय ४२, रा. शिरपूर, जि. धुळे) आणि सुनील ईश्वर सोनार (वय ३५,रा. बालाजीनगर, शिंगावे, ता. शिरपूर, जि. धुळे) यांच्याकडे विकल्याची माहिती दिल्याने त्यांनाही ताब्यात घेण्यात आले. या दागिन्यांची विक्री पुढे सागर प्रकाश जगदाळे (रा. आंबेडकर रस्ता, शिरपूर, जि. धुळे) या सुवर्णकाराकडे झाल्याची कबुली संशयित आरोपींनी दिली.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव, अंमलदार शाहीद शेख, गणेश धोत्रे, गणेश लोंढे, अरूण गांगुर्डे, फुरकान शेख, सोमनाथ झांबरे, अशोक लिपणे, विशाल तनपुरे, अमृत आढाव, प्रशांत राठोड, महादेव भांड, भगवान धुळे यांच्या पथकाने केली आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ७ नवे पोलिस ठाणे मंजूर होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी ७ नवीन पोलिस ठाणे मंजूर करण्यात येणार असून, ५५० पोलिस कर्मचाऱ्यांची पदे मंजूर केली जाणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जुलै रोजी विधानसभेत बोलताना दिली.

श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी तसेच कमी असलेले पोलिसांच्या संख्याबळ या विषयासंदर्भात लक्षवेधी मांडली होती. तसेच श्रीगोंदा येथे स्वतंत्र पोलिस उपअधीक्षक कार्यालय मंजूर करण्याची मागणीही केली होती. त्यास उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पोलिस संख्याबळ आणि पोलिस ठाणे यांचे निकष १९६० साली ठरलेले होते. त्यात आता बदल करण्यात आला असून, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ७ नवीन पोलिस ठाणे मंजूर केले जाणार आहेत. त्यातील एकाला मंजुरी मिळाली असून, ६ पोलिस ठाण्यात या मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत. तसेच पोलिसांचे संख्याबळ वाढविण्यासाठी ५५० नवीन पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव असून, याबाबत एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल. श्रीगोंदा येथील पोलिस उपअधीक्षक कार्यालयासंदर्भात निकष पाहून निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी विधानसभेत सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन...

## सामुदायिक शेती...गरजेची व फायद्याची...

आजही भारतीय खेड्यात वसत असून कृषी प्रधानता तेथे अनिवार्य दिसते. शहरीकरण वाढल्यापासून जमिनीचे भाव प्रचंड वाढत असल्याने शेतीसाठीची भूमी कमी कमी होत चालली आहे त्यात बऱ्याचदा नुकसान अन् बेभरवशाच्या पावसाने शेतीकडे उदासिनता वाढली आहे. त्यात कुटुंबाप्रमाणे त्यांच्या मालकीच्या शेत जमिनीतही तुकडे होत आहे. ही केवळ आर्थिक, व्यावसायिक, समस्या नसून कौटुंबिक व सामाजिक प्रश्न वाढले आहेत.



असो, सांगायचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कमी जमीन मोठ्या प्रमाणावरील जिरायती भाग यांनी शेतीची प्रगती खुंटली. यावर शेतकऱ्यांच्या नव्या पिढीने एकत्र येवून गांभीर्याने सामुदायिक शेतीचा विचार करीत त्याची अंमलबजावणी सुरू केली पाहिजे.

वेळ साधली तर क्रांती करता येते. मोठा बदल घडवता येतो. मग ते क्षेत्र कोणतेही असो. अर्थात हे सूत्र फार कमी जणांना जमते. शेतीच्या बाबतीत मात्र हे तंत्र एका अख्ख्या गावाने अवगत करुन कायापालट केला असे सांगितल्यास नक्कीच विश्वास बसणार नाही. सिंधुदुर्गातील वेतोरे (ता.वेंगुर्ले) गावाने ही किमया साधली आहे.

कोणत्या वेळी काय पिकवायला, विकायला हवे याचे गणित जुळवून त्यांनी आंबा, काजू, भाजीपाला, कणगर या पारंपारिक पिकांच्या मदतीने गावाचे अर्थकारणच बदलून टाकले. यातून तयार झालेला शेतीचा 'वेतोरे पॅटर्न' नव्या दमाच्या युवा शेतकऱ्यांनी अभ्यासावा.

'अनामिका' नावाची नदी असलेल्या या वेतोरे गावात हजारही लोकवस्ती नाही पण पीक पद्धतीचे योग्य नियोजन करत, एकमेकांतील स्पर्धा टाळीत, विक्रीसाठी बाजारपेठेचे अचूक मूल्यमापन करीत किफायतशीर शेती केली. जमीन कमी पडली तेव्हा आजूबाजूच्या गावांची जमीन विश्वासाने घेऊन सहकार तत्त्वाने अशा प्रकारची सामुदायिक शेती यशस्वीपणे करुन दाखवली. आपल्या जिल्ह्यानेही शेती यशस्वीपणे करुन दाखवली. आपल्या जिल्ह्याने सहकार शेती, पाणी व्यवस्थापन केल्यास शेती फायद्याची ठरेल यात शंका नाही.

# राज्यात कायदा सुव्यवस्था राहिलीय काय?

(पान १ वरुन)

## मुख्यालयातील महिला पोलिसाच्याच घरातून चोरी

यांच्या राहत्या घरी पाईपलाईन रोडवरील यशोदानगर येथे गेल्या. तेथून रात्री ८.४५ वाजता परत आल्यानंतर त्यांनी घराचे कुलूप उघडले असता घराचा दरवाजा उघडला नाही, दरवाजाला कोणीतरी आतून कडी लावल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी दरवाजा लाथ मारुन उघडला असता, घरातील कपाटे व इतर सामान अस्ताव्यस्त असल्याचे दिसून आले. पाठीमागील दरवाजा उघडा असल्याचेही निदर्शनास आले. यावरुन चोरट्यांनी मागच्या दरवाजातून प्रवेश करुन घरफोडी केल्याचे स्पष्ट झाले.

फिर्यादी ढाकणे यांनी तात्काळ तोफखाना पोलिसांना माहिती दिल्यानंतर, फिंगरप्रिंट आणि डॉग स्क्वॉड पथकासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान, घरातील लोखंडी कपाटातून साडेचार ग्रॅमचे सोन्याचे झुबे, चार ग्रॅमची गोल सोन्याची अंगठी, साडेतीन ग्रॅमचे गंठण, साडेतीन ग्रॅमचे सोन्याचे डोरले, सात भार वजनाच्या चांदीच्या पायातील पट्ट्या, सात भार वजनाची चांदीची गळ्यातील चैन, १० हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी सुनंदा ढाकणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलीस हवालदार गडाख करीत आहेत. या प्रकारामुळे पोलीस मुख्यालयात राहणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिस मुख्यालयात राहत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या घरात चोरी होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.

## मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याला माजी नगरसेवकाकडून दमबाजी

महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश बाबुराव राजुरकर (वय ५०, रा. चाणक्य चौक, बुरूडगाव रस्ता) यांना त्यांच्या कर्तव्यावर असताना माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे (रा. माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी दमदाटी करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी डॉ. राजुरकर यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १७ जुलै रोजी सायंकाळी घडली. तक्रारदार डॉ. राजुरकर हे जुन्या कोर्टाजवळ मनपाच्या आरोग्य विभागाच्या कामावर असताना, बाळासाहेब बोराटे हे एक व्यक्तीला सोबत घेऊन घटनास्थळी आले. त्यांनी संबंधित व्यक्तीच्या आजीच्या मृत्यूच्या नोंदीबाबत चर्चा करताना डॉ. राजुरकर यांना 'तुम्ही कामच करत नाही, तुम्ही नोकर आहात हे विसरू नका', अशा शब्दांत दमबाजी केली. डॉ. राजुरकर यांनी बोराटे यांना प्रशासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीची माहिती देऊनही त्यांनी संतप्त होत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकारामुळे डॉ. राजुरकरांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदवला आहे.

## महावितरणच्या अभियंत्याला जिवे मारण्याचा प्रयत्न; केडगावमधील घटना, माजी नगरसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल

केडगाव येथील महावितरणच्या उपकेंद्रात कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता राहुल सिताराम शिलावंत (वय ३५,रा. शाहुनगर, केडगाव) यांच्या अंगावर माजी नगरसेवक मनोज कोतकर याने वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात शिलावंत यांनी फिर्याद दिली असून मनोज कोतकर याच्याविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा तसेच अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राहुल शिलावंत हे महावितरणमध्ये सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. १६ जुलै रोजी सायंकाळी ते त्यांच्या कार्यालयात बसलेले असताना, मनोज कोतकर याने त्यांना फोन करून लोंढे मळा, खंडोबा मंदिर परिसरातील विद्युत वितरण बॉक्स बसविण्याबाबत विचारणा केली. मला न सांगता, न बोलावता तुम्ही बॉक्स कसे बसविले असे विचारले, त्यावेळी अभियंता शिलावंत यांनी त्यांना एकच बॉक्स बसविला आहे. अजून बॉक्स बसवायचे आहेत, त्यावेळी तुम्हाला बोलावू, असे सांगितले मात्र तरीही कोतकर याने तुम्हाला कळत नाही का, त्या कामाचे श्रेय दुसरेच लोकं घेतात, असे म्हणत रागाच्या भरात फोनवरूनच शिवीगाळ सुरू केली आणि ऑफिसमध्ये थांब, मी येतो असे धमकीवजा बोलून फोन कट केला. त्यानंतर दहा मिनिटांतच मनोज कोतकर हा पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा वाहनातून कार्यालयासमोर आला, त्यावेळी अभियंता शिलावंत हे केबिनमधून बाहेर आले असता कोतकर याने वाहन भरधाव वेगात चालवत शिलावंत यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी त्यांचे सहकारी वैभव निकम व पोपट सातपुते यांनी त्यांना वेळीच बाजूला ओढून वाचवले. त्यानंतर कोतकर याने वाहनातून उतरून अभियंता शिलावंत यांना जातीवाचक अपशब्द वापरून अपमानित केले व धमकी दिली. या संपूर्ण घटनेनंतर शिलावंत यांनी आपल्या वरिष्ठ अधिकार्‍यांना घटनाक्रम सांगितला आणि दुसऱ्या दिवशी १७ जुलै रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी मनोज कोतकर विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा तसेच अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे.पोलीस उपअधीक्षक अमोल भारती अधिक तपास करीत आहेत.महावितरणच्या केडगावमधील याच कार्यालयात अधिकारी, कर्मचारी यांना मारहाण करण्याचीही घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. त्यावेळी ही माजी नगरसेवक अमोल येवले यांच्या विरोधात गुन्हा दाखल झालेला आहे.

# स्वतःच्या छातीवर चाकू मारुन तरुणाची आत्महत्या

## पत्नीचाही इमारतीवरुन उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न

नगर – पती–पत्नीत झालेल्या वादातून पतीने स्वतःच्या छातीवर चाकूने वार करत आत्महत्या केली तर पतीच्या आत्महत्येनंतर पत्नीने देखील इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारत आत्महत्येचा प्रयत्न केला. यात ती गंभीर जखमी झाली आहे. ही घटना नगर एमआयडीसी जवळील गजानन कॉलनी येथे वडगाव गुप्ता रोडवर १७ जुलै रोजी रात्री १०.३० च्या सुमारास घडली.

मूळचा उत्तर प्रदेशचा आणि सध्या गजानन कॉलनी येथे वास्तव्यास असलेला अनिल ध्रुव खरवाल (वय २६) असे मयत तरुणाचे नाव आहे. तर त्याची पत्नी किरण अनिल खरवाल ही जखमी झालेली असून तिच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या पती पत्नी मध्ये काहीतरी वाद झाला, त्यामुळे रागाच्या भरात अनिल याने स्वत: त्याच्या छातीवर चाकू मारून घेतला. त्यामुळे घटनास्थळी रक्ताचा थारोळा पाहून, त्यांच्या पत्नीने घाबरुन गाडी बोलवा गाडी बोलवा दवाखान्यात न्या असा आरडा ओरडा केला.

त्यानंतर तिने इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारली. त्यात ती जमिनीवर पडून जखमी झाली. हा आरडाओरडा ऐकून शेजारील नागरिकांनी तेथे धाव घेतली असता अनिल रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला तर त्याची पत्नी ही घराबाहेर पडलेली दिसली. काही नागरिकांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावून दोघांना उपचारासाठी जिला शासकीय रुग्णालयात दाखल नेले. तेथील डॉक्टरांनी अनिल खरवाल याला तपासून तो औषधोपचारापूर्वी मयत झाला असल्याचे घोषित केले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कुलकर्णी यांच्या अहवालावरुन आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर किरण खरवाल हिचेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पती–पत्नीमध्ये नेमका कशावरून वाद झाला? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# अहिल्यानगर मनपा आरोग्य अधिकाऱ्यांना झालेल्या दमदाटीच्या निषेधार्थ कर्मचारी युनियनची 'निदर्शने'

नगर – महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांना माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी कामकाजात हस्तक्षेप करीत दमदाटी केल्याच्या निषेधार्थ महापालिका कार्यालयात कर्मचारी युनियनच्या वतीने निषेध सभा घेवून निदर्शने करण्यात आली.



आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांना झालेल्या दमदाटीच्या निषेधार्थ महापालिकेत निदर्शने करताना कर्मचारी. (छाया – लहू दळवी)

यावेळी युनियनचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शहर अभियंता मनोज पारखे, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, विठ्ठल उमाप, महादेव कोतकर, बाबासाहेब राशीनकर, उपाध्यक्ष अमोल लहारे, भास्कर अकुबत्तीन, प्रफुल्ल लोंढे, अजित तारु, राजेंद्र बोरुडे, सोनू चौधरी, किशोर कानडे, राहुल तनपुरे यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते.

आनंदराव वायकर म्हणाले की, महापालिकेमध्ये अधिकारी कर्मचारी काम करत असताना त्यांना दमदाटी, धक्काबुक्की, शिवीगाळ करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढले आहेत, यावर आळा बसणे गरजेचे आहे. डॉ. राजुरकर यांच्या संदर्भात घडलेल्या प्रकारामध्ये पोलिसांनी व मनपा प्रशासनाने आणि युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने मदत केली व संबंधितावर गुन्हा देखील दाखल केला आहे. अशा घटना घडू नये यासाठी मनपा प्रशासनाने कामकाजामध्ये नियमावली करून द्यावी व कर्मचाऱ्यांनी देखील आपल्याला दिलेल्या कामाची जबाबदारी ओळखून काम करावे आणि नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करावा.

नागरिकांशी बोलताना देखील कर्मचाऱ्यांनी प्रेमाने, आपुलकीने बोलावे. आपली संस्था ही नगरकरांची असून आपण सर्वजण मिळून शहरवासीयांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करू, मात्र अशा घटना होऊ नये याची जबाबदारी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. विनाकारण अधिकारी कर्मचारी यांना त्रास देणे योग्य नाही युनियन कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी असल्याचे आनंद वायकर म्हणाले.

### त्रास देऊन व शिव्या देऊन काम होत नसते

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर म्हणाले की, अन्यायाच्या विरोधात सर्व अधिकारी कर्मचारी यांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजेत माझ्या बाबत घडलेल्या घटने संदर्भात प्रशासन ठामपणे उभे राहिले आहे. शासकीय नोकरी करीत असताना आपण समाजासाठी काम करत असतो, नियमबाह्य काम करणार नाही तसेच वाद न घालता चर्चेद्वारे प्रश्न सुटणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. त्रास देऊन व शिव्या देऊन काम होत नसते उलट अधिकारी मनस्ताप करत असतात नोकरी करण्याची इच्छा राहत नाही अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे

### कर्मचाऱ्यांचे आयुक्तांना निवेदन

यावेळी आयुक्तांना कर्मचाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.वारंवार महापालिकेच्या कार्यालयामध्ये नागरिक व पदाधिकारी येवून कर्मचारी व अधिकारी यांना धमकी देणे व शिवीगाळ करणेचे प्रकार चालू असतात. याबाबत महापालिका प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेवून संबाधितावर कठोर कारवाई करावी, जेणे करून असे प्रकार वारंवार घडणार नाही. असे या निवेदनात म्हंटले आहे.

# आप्पासाहेब (पाटील) शिंदे यांचे निधन

श्रीगोंदा – तालुक्यातील सुरेगाव येथील माजी सरपंच, पोलिस पाटील आप्पासाहेब (आप्पापाटील) कोंडिबा शिंदे (वय ९०) यांचे १७ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे २ भाऊ, २ बहिणी, ३ मुले, १ मुलगी असा परिवार आहे. गावातील आनंदाश्रम स्वामी शाळेतील माध्यमिक शिक्षक छगन शिंदे यांचे ते वडील होत.



त्यांच्या पार्थिवावर सुरेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन तोंडाला रुमाल बांधून संशयित्या फिरणाऱ्या एका परप्रांतीय तरुणास नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई नगर पुणे रोड वरील चास शिवारात तिरंगा प्रिकास्ट सिमेंट कंपनी जवळ १७ जुलै रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास केली.

नगर तालुका पोलिसांचे पथक रात्री गस्त करीत असताना तिरंगा प्रिकास्ट सिमेंट कंपनी जवळ टपरीच्या आडोशाला अंधारात संशयितरित्या एक जण फिरत असल्याचे त्यांना दिसले. पोलिसांनी अडवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव वीरेंद्रकुमार वेरास्पतिया सदे (वय २०, रा.कमलपूर, मधुबन्नी, बिहार) असे असल्याचे सांगितले. त्यास इतक्या रात्री इकडे काय करतोस असे विचारले असता त्याने समाधानकारक उत्तर न देता ऊडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी त्यास ताब्यात घेतल्याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सुगंधी तंबाखू पासून मावा बनवणाऱ्या कारखान्यावर छापा; २ लाख ८ हजार रुपयांच्या मुद्देमालासह ४ ताब्यात

नगर – राज्यात प्रतिबंधीत असलेल्या सुगंधी तंबाखू पासून मावा तयार करुन विक्री करणाऱ्या कारखान्यावर पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाने छापा टाकून चौघांना ताब्यात घेत त्यांच्या कडून २ लाख ८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई काटवन खंडोबा रोडवरील डांगे मळा परिसरात १७ जुलै रोजी दुपारी करण्यात आली.



डांगे मळा परिसरात मावा बनविण्याचा कारखान्यावर छापा टाकून जप्त केलेल्या मुद्देमाल व आरोपींच्या समवेत पोलिस अधिक्षकांचे विशेष पथक.

या बाबतची माहिती अशी की पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाचे प्रमुख पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे हे शहरात अवैध धंद्याची माहिती घेत असतानात्यांना माहिती मिळाली की, कैलास बबन मोकाटे व सुभाष डागवाले हे काटवन खंडोबा रोडवरील विश्वास डांगे यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये सुगंधी तंबाखू व सुपारीपासून बनवला जाणारा मावा तयार करुन त्याची विक्री करत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी पथकाला कारवाई साठी पाठविले. या पथकाने तत्काळ तेथे जावून छापा टाकला, त्यावेळी काही जण मशीनवर सुगंधी तंबाखू व सुपारी मिसळून मावा तयार करताना आढळले. पोलिसांनी या ठिकाणाहून श्याम पांडुरंग मोकाटे (वय २८), कैलास बबन मोकाटे (वय ५८, दोघे रा. महात्मा फुले रोड, माळीवाडा), सुभाष गुलाब डागवाले (वय ५३, रा. भोपळे गल्ली) व राहुल सुधीर पारधे (वय ३४, रा. हरिजन वस्ती, माळीवाडा) या चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून मावा बनवण्यासाठी वापरले जाणारे दोन इलेक्ट्रिक मशीन, ३० किलो कच्चा माल, १९ किलो तयार मावा, ६ किलो सुगंधी तंबाखू, कटींग सुपारी, चुना इत्यादी मिळून २ लाख ८ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. यावेळी कैलास मोकाटे व सुभाष डागवाले यांच्याकडे मशीन व मालाची मालकी असल्याची दोघांनी कबुली दिली, तर श्याम मोकाटे व राहुल पारधे हे दोघे कामगार म्हणून काम करत असल्याचे सांगितले.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. अमोल कांबळे यांच्या फिर्यादीवरुन चौघांच्या विरुद्ध बी एन एस कलम १२३, २२३, २७४, २७५, व अन्न सुरक्षा कायद्यानुसार ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई परीविक्षाधिन पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलिस अंमलदार शंकर चौधरी, अजय साठे, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, अरविंद भिंगारदिवे, उमेश खेडकर, सुनिल पवार, दिनेश मोरे, सुनिल दिघे, अमोल कांबळे, संभाजी बोराडे, विजय ढाकणे, दीपक जाधव, जालिंदर दहिफळे यांच्या पथकाने केली आहे.

# अहिल्यानगर येथे २७ जुलै रोजी 'निधी आपके निकट'

नगर – निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, अहिल्यानगर येथे २७ जुलै रोजी सकाळी १० वाजता 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या अडचणी असतील तर आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### व्यायाम करा पण...

लोक जिममध्ये तासनतास घाम गाळतात ही एक चांगली सवय आहे, पण तुम्हाला माहिती आहे का की व्यायाम करण्याच्या तुमच्या उत्साहात तुम्ही तुमच्या हृदयाकडे दुर्लक्ष करत आहात का? जर तसे असेल तर त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो! खूप तीव्र व्यायामामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात. जर तुम्ही नवीन असाल, तर हलक्या व्यायामाने सुरुवात करा आणि हळूहळू तीव्रता वाढवा. वॉर्म-अप आणि कूल-डाऊन: कसरत करण्यापूर्वी वॉर्म अप आणि नंतर कूल-डाऊन करायला विसरू नका. यामुळे हृदय हळूहळू समायोजित होण्यास मदत होते, स्नायूंना बरे होण्यासाठी वेळ द्या. दररोज तीव्र व्यायाम करू नका. हे तुमच्या हृदयासाठी आणि शरीरासाठी महत्वाचे आहे. कसरत दरम्यान आणि नंतर पुरेसे पाणी प्या. जर तुम्हाला कोणताही जुनाट आजार असेल किंवा तुम्ही वृद्ध असाल, तर कसरत सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि नियमित तपासणी करा. लक्षात ठेवा, फिटनेस म्हणजे केवळ स्नायूंचे शरीर तयार करणे नव्हे तर निरोगी आणि मजबूत हृदय देखील आहे. श्शेवटी, निरोगी हृदय हे निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे!

## पाककला

### पोहे वडे

**साहित्य :** २ कप जाड पोहे, १/४ कप तांदूळाचे पीठ, १/४ कप कांदा, १/४ कप किसलेले गाजर, २ टेबलस्पून ढोबळी मिरची, १/४ कप कोथिंबीर, १ टीस्पून किसलेले आले, १ टेबलस्पून हिरवी मिरची, १/२ टिस्पून चाट मसाला/आमचूर पावडर, १ टिस्पून लाल तिखट, १ टिस्पून धणे पुड, १/२ टिस्पून हळद, १ टिस्पून मीठ

**कृती :** प्रथम पोहे पाण्याने धुवून घ्या नी बेताचे पाणी घालून ५/७ मिनीटे भिजत ठेवा. नंतर पाणी उपसून काढा. आता पोहे चाळणीत काढा म्हणजे सर्व पाणी निघून जाईल. पोहे हाताने चुरून घ्या. पोह्यामधे सर्व बारीक चिरलेल्या भाज्या घाला. कोथिंबीर, आल, हिरवी मिरची, चाट मसाला, मीठ घाला सर्व व्यवस्थित मिसळून घ्या. मेदूवडा सारखे वड्यांना आकार द्या. तेल तापत ठेवा तापले की वडे तळून घ्या. कुरकुरीत वडे तयार आहेत.सॉस किंवा चटणीबरोबर खायला द्या छान लागतात.

## वास्तू

पंचमुखी हनुमानजींचा फोटो लावताना या गोष्टी जाणून घ्या. चित्र नेहमी स्वच्छ ठिकाणी ठेवा. दर मंगळवारी किंवा शनिवारी चित्राला धूप आणि दिवा लावा. बाथरूमस मोर किंवा स्वयंपाकघरात कधीही चित्र लावू नका. पंचमुखी हनुमानजी तुमच्या घराची नकारात्मक ऊर्जा काढून टाकतात. म्हणून, ते मुख्य दारावर ठेवा. यामुळे तुमच्या घरात वाईट नजरेचा प्रभाव दिसून येणार नाही. तसेच, तुमच्या घरात सकारात्मकता राहील. जर मुख्य दरवाजा दक्षिण दिशेला असेल तर चित्र लावताना हनुमानजींचा चेहरा दक्षिणेकडे नसावा.

## सल्ला

✲ तोंडात फोड झाल्यास एक हाताचे बोट दुधावरील साईत बुडवा आणि त्या जागी लावा, आराम होईल.

✲ हिवाळ्यात खोबऱ्याचे तेल घट्ट होऊ नये म्हणून त्यात कॅस्टरचे ऑईलचे थेंब टाका आणि चांगले हलवून घ्या.

## सौंदर्य

मेकअप केला असेल तर काजळ लावण्यापूर्वी डोळ्यांखालील भागावर थोडासा प्राइमर किंवा फेस पावडर लावा. यामुळे काजळ जास्त काळ टिकेल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १९ जुलै २०२५

**पुष्य रवि, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, भरणी २४।३८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** यश मिळणार नाही. अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील.

**वृषभ :** वेळ सत्कारणी लागेल. वातावरण उत्साहवर्धक राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. हितशत्रूंपासून सावध राहावे.

**मिथुन :** आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल.

**कर्क :** नवीन कामांना चालना मिळेल. आपल्या यशाचा मूळ मंत्र कोणत्याच कामाला अशक्य न समजणे आहे.

**सिंह :** सामाजिक प्रतिष्ठा वाढेल यश. वाहने चालवताताना काळजी घ्यावी. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील.

**कन्या :** कामात पारदर्शकता हवी. खर्च अधिक होईल.

**तूळ :** कामात अडचणी येतील. आपली चूक स्वीकारावी लागेल.

**वृश्चिक :** कायदेशीर कामात आत्मविश्वास राहील. आपले अनुभव इतरांना मार्गदर्शक ठरतील.

**धनु :** पारिवारिक वाद वाढतील. खर्च होईल. अडकलेल्या कामात सुधारणा होईल.


**मकर :** नोकरीत कुणावरही विश्वास ठेवू नये. अडचणी येतील. सतत परिश्रमाने आर्थिक लाभ होतील.

**कुंभ :** मिळकती पेक्षा जास्त खर्च होईल. अनिश्चितता वाटेल. शत्रुपक्षाच्या कारवाया वाढतील.

**मीन :** आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानी होऊ शकते. नियंत्रण ठेवा.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हवामान सहन करू शकेल अशा शरीरयष्टीचा ४) हत्तीच्या पाठीवरचा शोभिवंत हौदा ६) विविध पदार्थांचे मिश्रण घालून बनविलेली नागवेलीच्या पानाची पुडी; तांबूल ७) मोठे खटले किंवा कुटुंब १०) काहीसे थंड १२) लक्ष्मीचा पती; विष्णू १५) मुस्लिमांची प्रार्थना १६) जी पेटविली असता स्फोट होतो अशी दारू भरलेली नळी १८) कोणत्याही ऋतुमानातील हवामान सहन करू शकेल अशा शरीरयष्टीचा १९) अनाथ; दीन २१) सोबत; सह; बरोबर २२) प्रसिद्धीस वगैरे द्यावयाचा मजकुराचा कागद २३) श्रीफळ

**उभे शब्द :-** १) विस्तृतपणे २) छिद्रात बसलेली प्रतिबंधक वस्तू; दातांत अडकलेला कण वगैरे ३) हुलकावणी; बतावणी; दंगा ४) आकाश; नभ; गगन ५) पायऱ्या असलेली विहीर ८) घोडा जोडलेले एक वाहन ९) भाषेचा एक अलंकार; एक दाक्षिणात्य खाद्यपदार्थ ११) पदार्थाचा उडालेला तुकडा १३) मानलेला मुलगा १४) तिसरी तिथी; तृतीया १६) भेग; फट १७) नाणी पाडण्याचा कारखाना १८) इच्छा; आकांक्षा; मनीषा १९) वडील; तात; जनक; पिता २०) पोस्ट; मेल; टपाल

**शब्दगंध क्र. ७२२२ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११९७ चे उत्तर**



# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** संघर्षातूनच सामर्थ्याची खरी परीक्षा होते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोड हा आजार पूर्णपणे बरा होत नाही का?

त्वचेच्यामध्ये असणाऱ्या रंग पेशींचा काही कारणांमुळे आभाव झाल्यास त्वचेचा रंग नाहीसा होतो याला कोड म्हणतात.

त्वचेखाली रंगद्रव्याचे प्रमाण कमी झाल्याने 'पांढरे डाग' येतात. मात्र पांढरे कोड का येते याची पूर्ण माहिती आपल्याला अजून तरी नाही. काही प्रकारचे कोड काही प्रमाणात आनुवंशिक आहेत. याचा अर्थ काही वेळा ते पुढच्या पिढ्यांत उतरू शकतात. पण दिसण्याचा भाग सोडल्यास कोडाचा इतर त्रास अजिबात नसतो. केवळ डागांसाठीच कोडावर उपचाराची इच्छा असते.

पांढरे डाग किंवा कोड हा समाजाच्या दृष्टीने दोष, पण वैद्यकीयदृष्ट्या आजार नाही. समाजात मात्र पांढरे डाग असणाऱ्यांच्या वाट्याला येते ती अवहेलना. खरे तर पांढरे डाग किंवा कोड असणे ही आपल्या शरीरातील रंगद्रव्यपेशींची कमतरता. मेलॅनिन हे रंगद्रव्य तयार करणाऱ्या मेलॅनोसाईट या पेशी हळूहळू नाहीशा झाल्यामुळे पेशींचा रंग हळूहळू पांढरा होत जातो.

आपल्या त्वचेचा रंग कायम तोच राहात नाही. हा रंग दररोज नव्याने तयार होत असतो. पहिला रंग निघूनही जात असतो. रंग तयार करणाऱ्या पेशींना 'पिगमेंट सेल्स' किंवा 'मेलॅनोसाईटस्' (रंगपेशी) म्हणतात. या पेशी शरीरातील काही अंतर्गत कारणांमुळे नष्ट झाल्या तर त्वचेचा रंग तयार होण्यात अडथळे येतात. अशा प्रकारे त्वचेच्या ज्या भागात रंग तयार होऊ शकत नाही तिथे पांढरा डाग पडतो. हा आजार संसर्गजन्य मुळीच नाही.

रंगपेशी नष्ट होण्याची कारणे खूप गुंतागुंतीची आहेत. अमुक एकाच कारणामुळे रंगपेशी मरतात असे सांगणे कठीण आहे.

कोड एखाद्याला केव्हा येईल याचा काही नेम नाही. कोड झालेले ५० टक्के रुग्ण हे दहा ते वीस वयोगटातले आहेत. त्यामुळे आपण त्याला तरुण आजार असंही म्हणू शकतो. अचानक पांढरे डाग तुमच्या अंगावर दिसू लागतात. त्यावेळी तुम्हाला कळतं की कोड आलं आहे. अर्थात प्रत्येक पांढरा डाग हो कोडाचाच असेल असं नाही

शरीरावर पांढरे डाग असलेल्या व्यक्तींना अनेकदा सामाजिक कुचंबणेला सामोरे जावे लागते. हे डाग संसर्गजन्य असतील की काय, ही निरर्थक भीती यामागे असते. तसेच अंगावर पांढरा डाग आला म्हणजे तो डाग कोडाचा (श्वेतत्वचा) असेल असेही अनेकांना वाटते. या मागोमाग येथे त्वचा विद्रुप दिसण्याची भीती. हे डाग लपवण्यासाठी अनेक मंडळी सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळतात, मनात न्यूनगंड बाळगू लागतात. पण या आजारावर उपचार नक्कीच आहेत. गरज आहे मनातील भीती काढून टाकण्याची! उपचाराचा कालावधी हा १-२ वर्षांचा असु शकतो त्यामुळे उपचार दरम्यान संयम आणि विश्वास महत्वाचा

## दयाळू मासा

अनेक वर्षांपूर्वी एका घनदाट जंगलात एक जलाशय होता. त्यात एक मोठा मासा राहत होता. तो सभ्य, दयाळू आणि शाकाहारी होता. एकदा त्या जंगलात दुष्काळ पडला. दुष्काळामुळे त्या जलाशयाचे पाणी आटू लागले. परिणामी, तिथे राहणारे सर्व प्राणी मदतीसाठी ओरडू लागले.

त्या जंगलातील सर्व झाडे वाळून गेली. मासे आणि कासवे चिखलात बुडू लागले आणि दुष्काळग्रस्त प्राणी आणि पक्षी ठार होऊ लागले. त्याच्या साथीदारांची ही दुर्दशा पाहून त्या महाकाय माशाची करुणा बोलकी झाली. त्याने ताबडतोब आपल्या शक्तीने पर्जन्यदेवता पर्जुनाला आवाहन केले. तो पर्जुनाला म्हणाला, हे पर्जुना, जर माझे उपवास आणि माझी कृत्ये खरी असतील तर कृपया पाऊस आण. त्याचे पुण्य अचुक सिद्ध झाले. पावसाच्या देवाने त्याची हाक स्वीकारली आणि लगेचच मुसळधार पाऊस पाडला.

अशाप्रकारे, त्या महान आणि सत्यवादी माशाच्या प्रभावामुळे, त्या जलाशयातील अनेक प्राण्यांचे प्राण वाचले.

तात्पर्य: नेहमी दयाशील असावे, सर्वांप्रती जाणीव असू द्यावी.

## जीवन का अमृत (भाग १)



यह एक ऐसा समय है, जब कि आपको बहुत सर्तक रहने की जरूरत है । अत: श्रद्धा और नियमित रूप से कार्य करते रहो। आपके सिर पर गुरु-सत्ता का हाथ है और वह आपको हर प्रकार की सहायता दे रही है।

नामलेवाओं को सदा अपनी आकांक्षाएँ हमेशा मौजूद रहने वाली गुरू-सत्ता में रखनी चाहिएँ, जो कि जिंदगी के हर क्षेत्र में हमारा मार्गदर्शन करती है और हमें संरक्षण और प्रेम देती है ।

सच्चा धर्म या रूहानियत, ज्योति और श्रुति के जरिये, आत्मा और परमात्मा का मिलन है, इस इंसानी शरीर या हरि मंदिर में। जितनी ज्यादा आत्मा बाहर से हटती है तथा स्थूल, सूक्ष्म और कारण की सीमाओं से ऊपर उठती है, तो सत्गुरु की दया से यह उतने ही ज्यादा रूहानी नजारे देखती है।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

इस सुनहरी सिद्धांत का, कि आप अंतर में जो कुछ भी देखें, उसके बीच में प्रवेश करते जाएँ और समय-समय पर मन ही मन, सिद्ध नामों का जाप करते जाएँ, हमेशा अनुसरण करना चाहिए। बाकी सब कुछ समय आने पर मिल जाएगा। कभी-कभी यह एक या दूसरी वस्तु को पाने की चाहत है, जो आपको नीचे ले आती है, क्योंकि अन्यथा जब आप पूर्ण रूप से एकाग्रचित हों, बिना किसी एक या दूसरी वस्तु को पाने के विचार के, तो सत्गुरु अपनी दया से, अंतर में आपका आश्चर्यजनक रूप से मार्गदर्शन करता है। पवित्र शब्द का तीव्र होना अच्छा है, पर अगर आप इसे बरदाश्त न कर पाएँ और इसका असर कम करना चाहें, तो आप उस समय सिमरन करें और इसकी तीव्रता कम हो जाएगी।

कृप्या ध्यान दें कि सोने के समय आप अपनी अंतरिक दृष्टि प्रेम से दिव्य-चक्षु पर टिकाएँ और पूर्णतया तनाव मुक्त हो जाएँ, सिर पर कार्यरत गुरु शक्ति में सभी इच्छाएँ और उम्मीदें रखते हुए कि वह आपको गहरी तथा ताज़गी देने वाली नींद की भेंट दे। इससे सिर्फ न आपको बहुत शांति मिलेगी, बल्कि उसकी दया से सपनों में दिव्य आंतरिक अनुभव भी बढ़ सकते हैं।

आप भाग्यशाली हैं कि सत्गुरु की दया से आपको जीते जी मरने का अनुभव हुआ और आप इस ऊँचे सत्य को प्रमाणित करते हैं।

मुझे पता लगा कि भजन-सिमरन में आपकी उन्नति रुक गई है। हो सकता है, ऐसा बिगड़े हुए पारिवारिक माहौल और भजन-सिमरन में नियमित रूप से समय न दे पाने के कारण हो। ऐसी बातें कभी-कभी हो जाया करती हैं और इनके लिए कर्मों को व्यवस्थित करने की जरूरत होती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

इलायची मनोदशा को सुधारती है। इसके बीजों को चूर्ण बना कर पानी में डालते हैं। इस काढ़े को शहद के साथ मिला कर लेना चाहिये। ये अवसाद को दूर करती हैं। काजू अवसाद और मानसिक कमजोरी के लिये बढ़िया उपचार हैं। मन को सक्रिय, प्रसन्न और ऊर्जावान बनाता है। यदि अवसाद से ग्रस्त है तो इस का मतलब है कि आप अपने भोजन में हरी सब्जियां जैसे पालक, और फलियों को शामिल नहीं कर रहे हैं। इन से फोलिक अम्ल बनता है जिस से अवसाद खत्म होता है। इसी तरह थकावट और अवसाद को दूर करने के लिये शहद का प्रयोग बहुत लाभकारी होगा। हर रोज एक सेव, ५ काजू या बादाम, ५ छोटी इलायची और ५ हरी पतियां पालक या सरसों का साग या बथुआ या मेथी या धनिया या पोदीना की खानी चाहिये ।

आज्ञा चक्र -३५-

मन - भोजन का प्रभाव

मनुष्य ईश्वर की सर्व श्रेट रचना है। परंतु आज

### आज्ञा चक्र

हरेक मनुष्य कोई न कोई रोग से दुखी है। किसी न किसी मानसिक विकार चिंता, भय, निराशा, अशांति, तनाव से पीड़ित है। इन सब से छुटकारा पाने लिये मनुष्य ध्यान की ओर मुड़ रहा है। प्रायः अच्छे योगी भी किसी न किसी बुरे संस्कार से दुःखी हैं। आज योगी भी किसी न किसी रोग से पीड़ित हैं। जिसे वह हिसाब किताब कह कर संतुष्ट हो जाते हैं। वास्तव में नकारात्मक सोच, नाकारात्मक कर्म और अति व्यस्तता और संतुलित भोजन की कमी से हमारे शरीर में कुछ विटामिन्स कम हो जाते हैं। यह विटामिन हमें भोजन से ही मिलते हैं। परंतु हम सब ने मान रखा है कि साधना से सब कुछ प्राप्त कर सकते हैं। दूध एक सम्पूर्ण भोजन है। परंतु दूध देने वाले पशु को अच्छा चारा खिलाना पड़ता है, उस को सर्दी गर्मी से बचाना पड़ता है। ऐसे ही योग से लाभ होते हैं परंतु योग लगाने वाले दिमाग को संतुलित भोजन भी देना पड़ता है, उसका रख रखाव करना पड़ता है, जिसकी राजयोगी प्रायः अनदेखी करते हैं। इस लिये साधना के साथ साथ शरीर का पूर्ण ध्यान रखो। उच्च पद पाने की लालसा में इसकी अनदेखी नहीं करनी चाहिये। अगर शरीर ठीक नहीं तो योग भी अच्छा नहीं लगेगा। दूध, दही, दाल, पनीर, घी, माखन, अनाज तथा फलों से शरीर शक्तिशाली बनता है। गेहूं, चावल, चने से ताकत मिलती है। विटामिन, मिनरल, खनिज तथा लवण देने वाली हरी सब्जियां हमें रोग मुक्त करती हैं तथा इन की कमी से हम बीमार होते हैं। चिकनाई शरीर को तुरंत ताकत पहुंचाती है। घी, तेल, माखन, मलाई, दूध, दही से चिकनाई मिलती है। प्रोटीन शरीर को विकसित करते हैं। रोग के बाद की कमजोरी को भी दूर करता है। रोजमरा के कार्य कर के जो कमजोरी होती है उसे पूरा करता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक :** मुलांनी आपआपसांत का भांडू नये... मुलांनो, तुम्हाला कळलं का मी काय सांगतोय ते बंडू सांग पाहू, तुला काय कळलं ते?

**बंडू :** आम्ही एकमेकांशी भांडायला नको

**शिक्षक :** अगदी बरोबर... पण का भांडायला नको?

**बंडू :** कारण परीक्षेला कोणाच्या मागे नंबर येईल सांगता येत नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ सिंगल कॉलम पिलरवर महामार्ग उड्डाण मेट्रो रेल्वेसाठी सर्वात लांब डबल डेकर व्हाया डक्ट पुलाचे बांधकाम कोणत्या शहरात पूर्ण झाले?

– नागपूर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

पहिल्या पाच ते सहा वर्षांपर्यंत मुलांचे आदर्श हे त्यांचे पालकच असतात व या मुलांसमोर पालकांचे असभ्य वर्तन हे जास्त धोकादायक असते. म्हणून पालकांनी आपले वागणे सुसंस्कृत ठेवायला हवे. आपल्या वागण्याने मुलांच्या मानसिकतेवर काय परिणाम होईल, याचा पालकांनी अवश्य विचार करावा. परंतु अनेकदा मुलांसमोर नेमके आपण कसे वागायचे, हे कधी आपल्या लक्षातच येत नाही; आणि जेव्हा कधी लक्षात येते, तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अनेकदा माझ्याकडूनही मुलांसमोर बोलताना चूक होते, परंतु दुसऱ्याच क्षणी माझ्या ती चूक लक्षात येते आणि मी लगेचच सकारात्मक वाक्यरचना वापरण्यास सुरुवात करते. अनेकदा पालक मुलांसमोर नातेवाइकांबद्दल, मित्रमैत्रिणींबद्दल वाईट बोलतात. मुलांच्या मनात वाईट पटकन बसले

### बौद्धिक विकास कसा करावा?

जाते व पुढेही ही मुले त्यांच्या आयुष्यात तशीच वागतात. अनेकदा मुले खोटे बोलण्यास शिकतात, परंतु खोटे बोलण्याची सुरुवात हा अनेकदा घरापासूनच झालेली असते. बऱ्याच वेळेला पालक मुलांसमोर छोट्या छोट्या गोमा खोटे बोलतात. की जी पालकांच्या दृष्टीने अतिशय छोटी गोष्ट असते, परंतु मुले त्यांचेच अनुकरण पुन्हा करते आ वातावरण आहे. नांवर कायम सूर करतात. उदा. बाबांना एखाद्या मित्राचा फोन येतो व बाबांना तो फोन घ्यायचा नसतो.

अशा ते मुलाला सांगतात 'फोन उचल आणि माझ्या मित्राला सांग, बाबा मोबाईल घरीच विसरून बार गेले आहेत.'

मूल टिपकागदाप्रमाणे अचूकपणे बाबांचे अनुकरण करायला लागते. आपले आई. बाबा, आजी-आजोबा, परिसरातील इतर त्यांच्या सोबत वावरणाऱ्या व्यक्ती कशा वागतात.हे। बघत असते. म्हणून या वयातील संस्काररूपी वागणे मूल स्पंजाप्रमाणे मेंदूत शोषून घेतो. मलांवर संस्कार हे आई-वडिलांच्या कृतीतून होत असतात. म्हणून आपण त्यांच्यासमोर चांगल्या वर्तणुकीचा आदर्श घालून देणे फार महत्त्वाचे आहे. मूल जे पाहते-ऐकते ते उत्सुकतेपोटी पन्हा पुन्हा करते आणि शिकते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिराचे उद्‌घाटन करताना सुभाष मुनोत आदी.

# दीन-दुबळ्या रुग्णांना नवजीवन देण्याचे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य देवदूताप्रमाणे

### सुभाष मुनोत यांचे प्रतिपादन; मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिरात ११० रुग्णांची मोफत तपासणी

नगर – व्याधीने ग्रासलेल्या दीन-दुबळ्या रुग्णांना आनंदऋषीजी हॉस्पिटल नवजीवन देण्याचे कार्य देवदूताप्रमाणे करीत आहे. आनंदऋषीजी महाराजांच्या विचाराने सेवाभाव हे ध्येय समोर ठेऊन आदर्शऋषीजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली या हॉस्पिटलची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. दर महिन्याला होणाऱ्या मोफत आरोग्य शिबिरातून सर्वसामान्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली जात असल्याचे प्रतिपादन सुभाष मुनोत यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिराच्या उद्‌घाटनाप्रसंगी मुनोत बोलत होते. यावेळी सौ. अलका मुनोत, सीए शांतीलाल मुनोत, ज्योती मुनोत, राजेंद्र मुनोत, चंद्रकला मुथा, संजय कटारिया, योगेश मुनोत, पारस मुनोत, शीतल मुनोत, स्मिता मुनोत, प्रकाश गांधी, संजय गांधी, मूत्रविकार तज्ञ डॉ. संकेत काळपांडे, डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनित देशपांडे, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, सतीश लोढा, डॉ. वसंत कटारिया, निखीलेंद्र लोढा, मानकचंद कटारिया, अभय गुगळे, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी आदी उपस्थित होते.

राजेंद्र मुनोत यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मोफत शिबिर सर्वसामान्य घटकांना आधार देत आहे. एका छताखाली सर्व आरोग्य सेवा मिळत असल्याने सर्वसामान्यांना याचा लाभ घेणे शक्य होत असून, या रुग्णसेवेतून निरोगी समाज घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

मूत्रविकार तज्ञ डॉ. संकेत काळपांडे म्हणाले की, मूत्रविकारच्या सर्व शस्त्रक्रियांसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत मशिनरी, दुर्बीण व अत्याधुनिक सेवा उपलब्ध आहे. माफक दरात या सेवा दिल्या जात असून, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत हे उपचार मोफत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अमेय सांगळे यांनी मूत्रविकार, पोटात दुखणे, लघवीचे त्रास अंगावर न काढता तातडीने प्राथमिक तपासणी करण्याचे आवाहन केले.

डॉ. स्वनित देशपांडे यांनी आरोग्याच्या लहान समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास, गंभीर आजारांचा सामना करावा लागतो. यासाठी काही त्रास जाणवल्यास तातडीने तपासणी करण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मुत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी संदर्भात ११० रुग्णांच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# पंजाबी व सिख समाजातर्फे पुणे येथे ३ ऑगस्ट रोजी वर-वधु परिचय संमलन

नगर – द पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे येथे पंजाबी व सिख समाजातर्फे पुणे येथे वर-वधु परिचय संमेलन ३ ऑगस्टला होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी संमेलनाचे आयोजन करण्यात येते व अशी माहिती कश्मीरी नागपाल, अरुण चोपडा, हरिष मदान, किशोर कंत्रोड यांनी दिली आहे.

माहितीसाठी पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे अरुण चोपडा मो.नं. ९६२३११६१७०, संगिता मल्होत्रा मो.नं. ९९२२४२९७१४, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) मो. नं. ८९९९८१२४०८/ ९२२६७८३१०१ हैद्राबाद पंजाबी सेवा समिती, उमेश ठकराल ९३४६४३४७८६, ऑफिस – ८१२५७४९९६५. पंजाबी हिन्दू एसोसिएशन जबलपुर होमसाईस कॉलेज रोड, नेपियर टॉउन, जबलपुर ऑफिस नं. ६२६३३०४८००, उमेश खुराना नं. ८०८५९५९८४९, आर के कपुर नं ९१३१५५०७००

सुरत पंजाबी समाज, राधाकृष्ण मंदिर, गेटवे हॉटेल जवळ, पारले पॉईट, ऑफिस ८१४००५५५८८, नरेश सेठ ९३७७७२२२००, कैलाश छाबडा ९३७४४२१२८०, अमदाबाद पंजाबी बिरादी, नवरंगपुरा चेरीटेबल ट्रस्ट तर्फे पंजाबी सेवा समाज हॉल, किशोर महेदिरता ९८२५०३५८२०, ठाकूर खुराना ९७२४६५९६१६, नागपुर सनातन भवन प्रेमनाथ सहानी ९८२२२०४०५७, नरेंद्र सेठिजा ९८९०३३४७४७, विनय ओबराय ९४२३१०३९४३, हेमंत सहानी ९८२३०३२५१२१२९, भोपाल पंजाबी समाज, मोहनसिंग कालारा ७०००४३२६०६, शशि वैद ९३०३०७९४४६, संजीव सचदेव ९४२५००९६३०, पंजाबी सनातन सभा रायपुर छत्तीसगड ऑफिस ९१११००२०९९, यशपाल कपूर ९९८१०१३४५६, प्रीतम अरोरा ९८२६३४९३३५, तिलक कक्कड ९८२७१८७०८७ इंदोर पंजाबी समाज, बलराज सबलोक ९६४४४७१०८९, श्वेता खत्री ७३५४६१९९६०, विजय ग्रोवर – ९४२५४८०७०९, नाशिक, किरण कालरा – ९४२२७४६६८५, अशोक ग्रोवर ९५२७४७२४७९, पंजाबी वेलफेअर फौडेंशन, पुणे पिंपरी हरिष मदान ९३२५६५९१४२, सुरेंद्र वाधवा ८६००८६६०००, लिना सप्रा ९८६०६०७१२७ व किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ पुणे कॅम्प गुरुद्वारा, पुणे विक्रम सिंग कांड ९९२२९३१८८०, उत्तर प्रदेशचे खत्री समाजचे अध्यक्ष आचल महरोत्रा ९५५५४११०९२, सिंकदराबाद गुरुव्दारा साहेब, नियर रेल्वे स्टेशन जवळ सिंकदराबाद बलदेवसिंग बग्गा ९८४८०४४४४५, हैदराबाद गुरुव्दारा साहेब बहरमबाला सिख छावणी हैदराबाद सुखदेव सिंग- ९९४९६२२५३, अहिल्यानगर किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदिरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर यांना संपर्क साधा, असे आवाहन चंद्रकुमार मुनोत, हरीष मदान, मोहन सिंग कालरा, सुरेंद्र वाधवा, अरुण चोपडा, किशोर महेदिरता, नरेंद्र सेतीजा, प्रेमनाथ सहानी, यशपाल कपूर, तिलक कक्कड, नरेश सेठ, विनित अरोरा, किशोर कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, प्रदिप पंजाबी यांनी केले.



सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात आयोजित केलेल्या हिंदी भाषा परीक्षेत यश संपादन केले. या परिक्षेला एकुण ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यातील अंगद काळे, सार्थक काळे, प्रज्वल पिसोरे व उत्कर्ष गोराणे यांनी बालबोधिनी या गटात विशेष योग्यता प्राप्त केली असून २८ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी व ३ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे. सर्व विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिक्षिका उज्वला पंडित यांचे मार्गदर्शन लाभले असून मुख्याध्यापिका जयश्री खरात व पर्यवेक्षिका नेहा केदारे यांनी अभिनंदन केले आहे.

# भाग्योदय विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप

नगर – नगर तालुक्यातील भोयरे पठार येथील भाग्योदय विद्यालयात इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



भाग्योदय विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले.

सर्व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. शाळेचे नवीन गणवेश मिळाल्याने शालेय विद्यार्थी भारावले.

मुख्याध्यापक हबीब शेख म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने भाग्योदय विद्यालय कार्यरत आहे.

शाळेचे मुख्याध्यापक हबीब शेख यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना गणवेश वितरित करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षक संजय गोसावी, भरत लगड, सतीश मुसळे, शिवाजी धस, रामदास साबळे, सुनिता दिघे, अशोक टकले, मनिषा वाटोळे विविध परीक्षेत शाळेचे विद्यार्थी गुणवत्तेमुळे चमकत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनातील आनंद वाढविण्यासाठी आणि शिकण्याची गोडी टिकवून ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'डिजिटल युगातील पत्रकारिता व मूल्यांची पुनर्स्थापना'वर १९ जुलै रोजी सोनईमध्ये 'मीडिया संमेलनाचे आयोजन'

सोनई – 'डिजिटल युगातील पत्रकारिता आणि मूल्यांची पुनर्स्थापना' या विषयावर विचारमंथन घडवून आणण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, सोनई (ता. नेवासा) येथे मीडिया संमेलनाचे आयोजन १९ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले आहे.

पत्रकारिता ही समाजाचे दर्पण मानली जाते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात पत्रकारितेचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले असून, 'पेन ते पेनलेस पत्रकारिता' या प्रवासात पत्रकारितेतील शाश्वत मूल्य हरवत चालल्याची जाणीव या संमेलनात व्यक्त होणार आहे. त्यामुळे या मूल्यांचे पुन्हा पुनर्स्थापन करणे काळाची गरज ठरत आहे.

या संमेलनासाठी मीडिया प्रभाग, राजयोग शिक्षण आणि शोध प्रतिष्ठान, माऊंट आबू (राजस्थान) तर्फे ब्रह्माकुमार डॉ. शांतनू भाईजी (राष्ट्रीय समन्वयक, मीडिया प्रभाग) आणि प्रा. डॉ. सोमनाथ वडनेरे (मीडिया प्राध्यापक व महाराष्ट्र राज्य मीडिया प्रभाग समन्वयक, जळगाव) यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

संमेलनासाठी प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सायबर, सोशल मीडिया, जनसंपर्क, जाहिरात क्षेत्र तसेच मीडिया शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या विचारमंथनात सहभागी होण्याचे आवाहन ब्रह्माकुमारी उषा दिदी, संचालिका, ब्रह्माकुमारी सेवाकेंद्र, सोनई यांनी केले आहे.



शिवरंजन सांगितालयाच्या संगीत परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक. (छाया- श्रीकांत वंगारी)

# शिवरंजन संगितालयच्या तबला विद्यार्थ्यांचे संगीत परीक्षेत यश

नगर – एप्रिल-मे २०२५ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, तबला विषयात शिवरंजन सांगितलायच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना लक्ष्मण डहाळे, प्रकाश शिंदे आणि सूरज शिंदे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

संगीत परीक्षेत प्रारंभीक स्तरात रवी धूप्पड, वीरेन नगरे आणि आदित्य फडणीस यांनी यश मिळवले. प्रवेशिका प्रथम परीक्षेत मल्हार वाघ, श्रीणंद कळेढोणकर, कैवल्य कुलकर्णी आणि आर्यन पाटील हे विद्यार्थी यशस्वी ठरले. प्रवेशिका पूर्ण परीक्षेत कृपाल शहापूरकर यांनी उज्वल यश मिळवले, तर विशारद पूर्ण परीक्षेत लौकिक घोडके यांनी सर्वाधिक गुण मिळवत केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला.

# ग्रंथालय भारतीच्या (नागपूर) अहिल्यानगर शाखेची स्थापना

### अध्यक्षपदी मिलिंद वैद्य, सचिवपदी नंदकिशोर आढाव तर उपाध्यक्षपदी अमोल इथापे यांची नियुक्ती

नगर – ग्रंथालय भारतीच्या (नागपूर) अहिल्यानगर शाखेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षपदी मिलिंद मोरेश्वर वैद्य व सचिवपदी नंदकिशोर आढाव यांची तर उपाध्यक्षपदी अमोल इथापे यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे केंद्रीय अध्यक्षस्थानी डॉ. राजेशशेखर बालेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रांत संघचालक नानासाहेब जाधव व संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे केंद्रीय सचिव सुनील वायाळ व सहसचिव सहसचिव शिल्पा रसाळ उपस्थित होत्या.



ग्रंथालय भारतीच्या (नागपूर) अहिल्यानगर शाखेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षपदी मिलिंद वैद्य व सचिवपदी नंदकिशोर आढाव यांची तर उपाध्यक्षपदी अमोल इथापे यांची नियुक्ती करण्यात आली. (छाया – सुरेश मैड)

शिल्पा रसाळ यांनी नूतन पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची ओळख करून देऊन पार्श्वभूमी स्पष्ट केली. यावेळी निवडण्यात आलेली ग्रंथालय भारतीची अन्य कार्यकारणी – सहसचिव सुहास पछाडे, कोषप्रमुख योगेश पंडित, कार्यकारिणी सदस्य आनंद कुलकर्णी, मकरंद राजहंस, नितीन भरताल, संदीप नन्नवरे, पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, विद्या पाठक, सुनील राऊत.

यावेळी केंद्रीय करण्याचे उपाध्यक्ष रवींद्र गुर्जर, डॉ. सत्यनारायण बाहेती, कोषाध्यक्ष वामनराव नीचंते, सदस्य लक्ष्मीकांत पाठक, बापू पाटील, चंद्रकांत जोशी, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. माया रंभाळे, डॉ.स्वाती मोहरीर, राजेश राठोड, डॉ. मंजू दुबे, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सदस्य विलास बडवे व राहुल तांबोळी उपस्थित होते.

# लेखी आश्वासनानंतर नागरदेवळे ग्रामपंचायतमधील ग्रामस्थांचे उपोषण मागे

नगर – मौजे नागरदेवळे ग्रामपंचायत हद्दीमधील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन कंपनी लिमिटेड मार्फत घरगुती गॅस पाईपलाईन खोदकामाच्या नुकसान भरपाईपोटी बीपीसीएल कंपनीकडे शुल्क मागणीत व बीपीसीएल कंपनीने ग्रामपंचायतला नुकसान भरपाईपोटी वर्ग केलेल्या पैशाच्या गैरव्यवहार थांबवण्याच्या व नागरदेवळे अमरधाम दुरुस्ती, गावाला पूर्णवेळ ग्रामसेवक व प्रशासक म्हणून ग्रामविस्तार अधिकारी यांच्या नियुक्तीच्या मागणीसाठी जिल्हा परिषद येथे आमरण उपोषण करण्यात आले होते. या मागणीची दखल घेऊन उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांच्या लेखी आश्वासनाने उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते निखिल शेलार, सुशील कदम, सागर खरपुडे, सागर चाबुकस्वार, मुकेश झोडगे, राजेश धाडगे यांना ज्यूस पाजवताना जि.प.सदस्य शरद झोडगे, संदेश कार्ले, माजी सभापती रामदास भोर, प्रकाश पोटे, अथर खान, अजित दळवी, समीर पठाण, कैलास पगारे, रामेश्वर निमसे, मच्छिंद्र बेरड, योगेश धाडगे, जालिंदर बोरुडे, निलेश दळवी, सोनू बिने, रविंद्र धाडगे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.



नागरदेवळे ग्रामपंचायतमधील अनागोंदी कारभाराविरोधात करण्यात आलेले ग्रामस्थांचे उपोषण लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.

नागरदेवळे ग्रामपंचायत हद्दीमधील घरगुती गॅस लाईन खोदकामाच्या नुकसान भरपाई बी.पी.सी.एल.कंपनीकडे शुल्क मागणीत व बी.पी.सी.एल कंपनीने ग्रामपंचायतला नुकसान भरपाई पोटी वर्ग केलेल्या पैशाच्या गैरव्यवहार थांबवण्याची मागणीसह नागरदेवळे गावठाण अमरधाम दुरुस्तीची मागणी करुण तसेच नागरदेवळे गावाला पूर्णवेळ ग्रामसेवक व प्रशासक म्हणून ग्रामपंचायत विभागाचा ग्राम विस्तार अधिकारी यांची नियुक्ती करण्याची मागणी मान्य केली तसेच ग्रामपंचायत कचरा गाड्या चोरी व एलईडी टीव्ही खरेदी घोटाळा तसेच कामाचे टेंडर न करता पैसे काढणे या तक्रारीचे निरासन करण्याकरिता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व नागरदेवळे ग्रामपंचायत अधिकारी यांच्या चौकशी संदर्भात तालुकास्तरीय समिती नेमण्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लेखी आदेश देण्यात आले.

# अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी पटकावला आंतरराष्ट्रीय गेम डेव्हलपमेंट स्पर्धेत प्रथम क्रमांक

### छोट्या डेव्हलपर्सचा पराक्रम

नगर – Srucked 3D गेम डेव्हलपमेंट चॅलेंज २०२५ ही स्पर्धा स्वित्झर्लंडस्थित कंपनी Struckd - 3D गेम क्रिएशन प्लॅटफॉर्मने आयोजित केली होती. एकूण १२० देशांनी ३,६५,००० संघांसह या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी अंतिम फेरीसाठी ६५ देश पात्र ठरले होते.



अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय गेम डेव्हलपमेंट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

भारत आणि चीनने ३१,००० संघांसह समान संख्येने भाग घेतला होता. यामध्ये नगरच्या रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील गेम डेव्हलपमेंट स्पर्धेत सांघिक प्रथम क्रमांक पटकावला आहे.

ही स्पर्धा एक कथा विकसित करण्यासाठी आणि कथेच्या आधारे एक खेळ डिझाइन करण्यासाठी होती. ज्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली आणि खेळ विकसित करण्यासाठी त्यांची प्रतिभा दाखवली आहे.


२५ एप्रिल रोजी शाळेच्या च्या सरजुदेवी मानधना सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत संगणक गेम डेव्हलपमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत आरुष बेडेकर (७ वी), रोनक वाळुंज (८ वी) मनस्वी सोहोनी (६ वी) यांनी भाग घेतला होता. त्यांना त्याच शाळेतील ९ वी मधील विद्यार्थी इशान जाजू याने प्रशिक्षण दिले. तिथेच या सगळ्यांची टीम जमली आणि त्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. ईशान जाजू या विद्यार्थ्यांने क्रोनो स्पेक्टर्स या संघाचे नेतृत्व केले. आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारा एक गेम या सगळ्यांच्या टीमने डेव्हलप केला. आणि लाखो सहभागींमधून प्रथम क्रमांक पटकावला. अहिल्यानगर शहरातील ही आजपर्यंतची कदाचित पहिलीच घटना असावी.

या सहभागींना सुवर्ण प्रमाणपत्रे, स्ट्रक्चर्ड 3D प्रो पॅकेजसाठी मोफत प्रवेश आणि आंतरराष्ट्रीयस्तरावरील कोणत्याही तंत्रज्ञान स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्लॅटफॉर्म शुल्क मिळणार आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, राजेश झंवर, शाळसमितीचे अध्यक्ष नंदकुमार झंवर, सचिव शरद कोलते, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. राधिका जेऊरकर, उपमुख्याध्यापिका सौ. गगन वाधवा, सेंटर ऑफ एक्सलॅन्स च्या इनचार्ज शिल्पा मुळे-दिवटे यासह सर्व संचालक मंडळाने अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

# एक दिल दो आवाज गीतांच्या कार्यक्रमाचे नगर शहरामध्ये २० जुलै रोजी आयोजन

नगर – येथील एस के मेलडी सिंगर्स ग्रुपच्या वतीने भारतीय सिनेमातील दिग्गज गायक मोहम्मद रफी व किशोर कुमार यांच्या गीतांची मैफल एक दिल दो आवाज चे आयोजन २० जुलै रोजी सावेडी येथील माऊली सभागृहात संध्याकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजक समीर खान व किरण उजागरे यांनी दिली.





या कार्यक्रमात किरण उजागरे, पवन फिरोदिया, समीर खान, सारंग पंधाडे, इस्थर पवार, मोहसीन सैफी, नेहा ओस्तवाल, समी खान, पुनम कदम हे कलाकार गीते सादर करतील. सूत्रसंचालन रियाज पठाण हे करतील. कार्यक्रम लाईव्ह म्युझिक बरोबर असल्यामुळे संगीत संयोजन निलेश सोजवल व ॲडवीन पेरेपाडम, साऊंड लाईट्स हर्मन प्रो ऑडीओ अँड लाईट्स श्रीरामपूर हे करतील, असे किरण उजागरे यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिकेसाठी ७०२०६८१४२२ या नंबरवर संपर्क साधावे.

# खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत नगरचा यश नगरकर कास्य पदकाचा मानकरी

नगर – हावरा, पश्चिम बंगालमध्ये झालेल्या खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत यश गणेश नगरकर हा कास्य पदकाचा मानकरी ठरला आहे.

नुकत्याच हावरा, पश्चिम बंगालमध्ये ११ ते १३ जुलै रोजी खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये श्री रामकृष्ण एज्युकेशन इंग्लिश मिडियमचा विदयार्थी यश नगरकर याने ब्रांझ पदक मिळविले. चि. यश याने या आगोदर मागील महिन्यातच



२९ जून रोजी अमरावती येथे झालेल्या तायक्वांदो स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवून त्याने नेपुण्य यश मिळविले आहे. त्याला आई प्राजक्ता नगरकर, वडील गणेश नगरकर तसेच स्टार तायक्वांदो अकॅडमीचे रविराज यादव यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

यश संपादन केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने यश नगरकर याचा सन्मान करण्यात आला.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजनचे अणू



पृथ्वीचा शेजारचा लाल ग्रह मंगळ नेहमीच संशोधकांच्या कुतूहलाचा आणि संशोधनाचा विषय असतो. एकेकाळी मंगळावर वाहते पाणीही होते. एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी विकसित होण्यासाठी ग्रहाचा कठीण पृष्ठभाग, ताऱ्यापासूनचे योग्य अंतर, पाणी या मूलभूत गोष्टी असाव्या लागतात. त्याबरोबरच योग्य वातावरण व ऑक्सिजनसारख्या 'प्राणवायू'चीही गरज असते. विशेष म्हणजे, यापूर्वीच एका संशोधनात मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजनचे अणू सापडलेले असून, हा शोध पृथ्वीपासून ४५ हजार फूट उंचीवर फिरणाऱ्या 'नासा'च्या सोफिया (स्ट्रॅटोफेरिक ऑब्झर्व्हेटरी फॉर इनफ्रारेड ॲस्ट्रॉनॉमी) या फिरत्या प्रयोगशाळेने लावलेला आहे.

ही वेधशाळा विमानाला लावलेली आहे. त्याच्या मदतीने पृथ्वीच्या वर ४५ हजार फूट उंचीवर निरीक्षणे नोंदवली जात आहेत. मंगळाच्या वातावरणात अगदी वरच्या थरात म्हणजे मेसोस्फिअरमध्ये ऑक्सिजनचे अणू आहेत, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. मंगळाच्या सुरुवातीच्या काळात वायू तेथून कसे निघून गेले, याचा अंदाजही त्यावरून येत आहे. मंगळावर ऑक्सिजनचे अणू सापडणे ही निश्चितच वेगळी घटना आहे, दुर्दैवाने मंगळावरील वातावरणात असलेला निम्माच ऑक्सिजन वैज्ञानिकांना आतापर्यंत सापडला आहे. वातावरणातील बदलांमुळे तेथे ऑक्सिजनचे प्रमाण कमी असावे, असे वैज्ञानिकांना वाटते. मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजन सापडण्याची ही पहिली वेळ नाही. व्हायकिंग व मरीनर यानांनी तेथील ऑक्सिजन १९७० मध्ये शोधला होता. पृथ्वीच्या वातावरणावरून मंगळावरील वातावरणात असलेल्या ऑक्सिजनचा अंदाज लावता येणे कठीण आहे, असे सोफिया प्रकल्पातील वैज्ञानिक पामेला मारकम यांनी म्हटले होते. मंगळाच्या वातावरणातील आण्विक ऑक्सिजन मोजण्यास कठीण आहे, त्यासाठी अवरक्त किरणांच्या विविध तरंगांचे निरीक्षण करावे लागते. सोफिया प्रयोगशाळेत स्पेक्ट्रोमीटर असल्याने ते शक्य आहे. पृथ्वीवरील निळे आकाश, भरपूर बाष्प व दाट वातावरण यामुळे मंगळावरचा ऑक्सिजन गेल्या ४० वर्षांत शोधता आला नव्हता. पृथ्वीच्या वातावरणातून मंगळाचे निरीक्षण करता येते व त्या मदतीने मंगळारील ऑक्सिजन शोधता आला. यातील सोफिया प्रयोगशाळा म्हणजे एक भले मोठे बोईंग विमान आहे. त्याला शंभर इंच व्यासाची दुर्बीण लावलेली आहे. सोफिया विमान पृथ्वीच्या वर ४५,००० फूट उंचीवर आहे त्यामुळे मधे कुठलेच अडथळे नसतात. सोफियाच्या मदतीने वैज्ञानिकांनी मंगळावरचे ऑक्सिजनचे अणू शोधण्यात यश मिळवले आहे.

## जीवसृष्टीच्या आरंभाबाबत नवं संशोधन



पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरुवात कशी झाली, याबाबत सातत्याने संशोधन सुरू असते. धूमकेतू किंवा लघुग्रहांच्या पृथ्वीला झालेल्या धडकेतून पृथ्वीवर पाणी आले असावे, असे मानले जाते. आता एका नव्या संशोधनातून असे आढळले आहे की, एका मोठ्या आकाराच्या लघुग्रहाच्या धडकेमुळे पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरुवात झाली. खरे तर मोठ्या उल्का आणि लघुग्रहांची धडक ही विनाशालाच कारणीभूत ठरत असते. अशाच एका लघुग्रहाच्या धडकेने पृथ्वीवरून डायनासोर नष्ट झाले होते. मात्र, या लघुग्रहापेक्षा २०० पट मोठ्या लघुग्रहाच्या धडकेनंतर पृथ्वीवर जीवसृष्टी विकसित होण्यास मदत झाल्याचे नव्या संशोधनात आढळले आहे.

या लघुग्रहाचे नाव 'ॲस्टेरॉईड एस २' असे आहे. ही एक अतिशय मोठी अवकाशीय शिळा आहे, जिचा आकार माऊंट एव्हरेस्टपेक्षा चौपट मोठा आहे. या लघुग्रहाच्या धडकेचा पृथ्वीवर मोठाच प्रभाव पडला. विशेषतः महासागरांवर हा प्रभाव महत्त्वाचा ठरला. एस२ चा २०१४ मध्ये सर्वप्रथम शोध घेण्यात आला होता. हा लघुग्रह सुमारे ३.२६ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीला धडकून पुढे गेला होता. पीएनएएसमध्ये प्रकाशित एका लेखात म्हटले आहे की हा लघुग्रह एस २ पृथ्वीला धडकला त्यावेळी महासागर जणू काही उकळले आणि मोठी सुनामी आली. अलीकडेच वैज्ञानिकांनी पृथ्वीवरील या धडकेचा प्रभाव जाणून घेण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या बार्बरटन ग्रीनस्टोन बेल्टमध्ये या लघुग्रहाच्या धडकेने बनलेल्या विवराचा अभ्यास केला. टीमने तेथील २२० पौंड खडकांचे नमुने गोळा केले आणि त्यांचा प्रयोगशाळेत अभ्यास केला.

त्यामध्ये आढळले की एस२ च्या धडकेने निर्माण झालेल्या सुनामीच्या लाटा समुद्रात ओसरल्या आणि त्याबरोबरच जमिनीवरील ढिगारा तटीय क्षेत्रांमध्ये वाहून आला. समुद्राच्या पृष्ठभागाचा स्तर बाष्पीभूत होऊन वातावरणाला उष्ण करू लागला. त्यामुळे तापमानात अत्याधिक बदल घडले. संशोधकांना खडकांमध्ये असेही पुरावे मिळाले, ज्यामुळे समजले की सुनामीने लोह आणि फॉस्फरससारख्या पोषक घटकांनाही नष्ट केले होते. संशोधकांना वाटते की, या घटनेने जीवनाच्या विकासासाठी आश्चर्यकारकरीत्या प्रेरित केले असावे. मुख्य संशोधक आणि हार्वर्ड विद्यापीठाचे भूवैज्ञानिक नादजा ड्रेबोन यांनी सांगितले, पृथ्वीच्या प्रारंभिक काळात मोठ्या उल्का किंवा लघुग्रहांचा सातत्याने प्रभाव पडत होता. त्यांनी प्रारंभिक जीवसृष्टीच्या विकासाला प्रेरित केले असावे; पण ते कसे हे माहिती नव्हते. लोह तत्त्व हे सर्वसाधारणपणे उथळ पाण्यात दुर्मीळ असते; पण मोठ्या सुनामीने ते खोल समुद्रातून बाहेर आले व तटीय क्षेत्रामध्ये हे महत्त्वाचे पोषक तत्त्व भरून गेले. त्यामुळे जीवसृष्टीला चालना मिळाली.

## थ्रीडी प्रिंटर बनवणार पोषक पदार्थ

अन्न तयार करण्यासाठीच्या तंत्रज्ञानातही आता अनेक नव्या सुधारणा होत आहेत. आता तर कॉफी मशिनसारखा खाद्यपदार्थ बनवणारा त्रिमिती प्रिंटरही बनवण्यात आलेला आहे. यामध्ये सॉफ्टवेअरचा वापर केलेला असून, खाद्य वाटणे, जेल, पावडर, द्रव घटक यांचा वापर करून यामध्ये संगणकाच्या मदतीने अन्नपदार्थ तयार करता येतात. तसेच त्यांना हवा तसा आकारही देता येतो. अन्नासाठीच्या त्रिमिती प्रिंटरने पारंपरिक स्वयंपाक पद्धतीला पर्याय निर्माण झालेला असला, तरी पारंपरिक पद्धतही अबाधितच राहणार, यात शंकाच नाही!

नवीन पद्धतीने पोषणाच्या सर्व गरजा भागवता येतील किंवा आपण जे पदार्थ खातो ते सर्वच यामध्ये शिजवता येतील, असे नाही. मात्र, त्यामुळे तुम्हाला व्यक्तिगत गरजेनुसार हवे तसे पोषणमूल्य असलेले अन्न मागणीनुसार तयार करता येईल. यामध्ये स्वयंपाकासाठी लागणारे घटक छोट्या शीतकुप्यांमध्ये असतील व त्यांच्या मदतीने आपण जशा आज्ञा देऊ तशा चवीचे व आकाराचे खाद्यपदार्थ तयार करता येतील, असे अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाचे हॉड लिप्सन यांनी म्हटलेले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात अन्न पदार्थ बनवणेही




शक्य होईल. डिजिटल रेसिपी यामध्ये वापरली जाईल. व्यक्तिगत आरोग्य माहितीच्या आधारे तुमचे खाद्यपदार्थ तयार करणारे अन्ननिर्मितीचे हे ॲप असणार आहे. यामध्ये अन्नाच्या प्रिंटरला म्हणजे त्याचा आकार ठरवणाऱ्या यंत्राला यांत्रिक हात जोडलेला असून, त्यामध्ये गोठवलेल्या घटकांचे आठ कप्पे आहेत. त्यामध्ये अन्नघटक शीत नसावेत, यासाठी इन्फ्रारेड पद्धतीने ते तापवण्याचीही व्यवस्था केली आहे.

## मोड आलेल्या मेथीचे लाभ



मेथी दाणे असोत किंवा मेथीची हिरवीगार भाजी, त्यांचे आरोग्यविषयक महत्त्व बरेच आहे. विशेषतः मोड आलेली मेथी आरोग्यासाठी अनेक प्रकारे लाभदायक ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. मोड आलेल्या मेथीमध्ये आवश्यक जीवनसत्त्व, खनिजे आणि ॲंटिऑक्सिडंट्स असतात. तसेच हे व्हिटॅमिन-सी, ए ने समृद्ध असून आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी फायदेशीर आहे. मोड आलेल्या मेथीच्या सेवनाचे हे काही लाभ...



**पचनासाठी फायदेशीर :** मोड आलेल्या मेथीमधील उच्च फायबर सामग्री पचनास मदत करून आणि कफ रोखून निरोगी पचन तंत्राला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**रक्तातील साखरेचे व्यवस्थापन :** मोड आलेली मेथी रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. हे मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर आहे.

**संरक्षण :** मोड आलेली मेथी ॲंटिऑक्सिडंट्स आणि ॲंटी-इंफ्लेमेटरी कंपाऊंडने परिपूर्ण असतात, जे संपूर्ण शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर आणि विविध आरोग्य समस्या कमी करण्यासाठी योगदान ठरू शकते.

**हृदयाचे आरोग्य :** अंकुरीत मेथी कोलेस्टेरॉलची क्षमता कमी करण्यास फायदेशीर ठरू शकते, जे हृदयविकारापासून बचाव करतात. तसेच कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असल्यामुळे मोड आलेली मेथी परिपूर्णतेची भावना वाढवू शकते.

**रोगप्रतिकारशक्ती :** मोड आलेली मेथी शरीरात संरचना असलेले व्हिटॅमिन-सी तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. मोड आलेल्या मेथीमध्ये फायटोएस्ट्रोजन गुण असतात, जे हार्मोनल समतोल राखतात. मोड आलेली मेथी हे कॅल्शियम आणि इतर खनिजांचे साधन आहेत, जे मजबूत हाडांसाठी फायदेशीर आहे.

## तीस टन वजनाची उल्का!



पृथ्वीवर अनेक वेळा उल्कावर्षाव होत असतो. अर्थात, पृथ्वीच्या वातावरणात येताच या अवकाशीय शिळा जळून त्यांचे छोटे तुकडेच जमिनीपर्यंत येत असतात. मात्र, पृथ्वीवर काळाच्या ओघात काही मोठ्या उल्काही कोसळलेल्या आहेत. अशीच एक उल्का अर्जेंटिनातील कॅम्पो डेल सिएलो येथे उत्खननात सापडली होती. या उल्केचे वजन तब्बल तीस टन इतके आहे. ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी उल्का असल्याचे काहींचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे हा उल्कापाषाण अखंड आहे. कॅम्पो डेल सिएलो या ब्युनोस आयर्सच्या उत्तरेला असलेल्या भागात सापडलेला हा उल्कापाषाण मोठा असून, त्यामुळे २६ विवरे तयार झालेली आहेत. ४ ते ५ हजार वर्षांपूर्वी हा उल्कापाषाण पडला असावा. त्याची पहिली नोंद स्पॅनिश गव्हर्नररांनी १५७६ मध्ये केली असून, काही लोक लोहखनिज गोळा करीत असताना त्यांना तो त्या वेळी दिसल्याचे सांगण्यात येते. हे लोह आकाशातून पडलेले आहे, असे त्यांनी म्हटले होते व स्पॅनिश अधिकाऱ्यांना उल्कापाषाण कोसळला ते ठिकाण दाखवले होते. कॅप्टन डी मिरावेल यांच्या नेतृत्वाखालील मोहिमेत काही लोहयुक्त उल्कापाषाण आणण्यात आले. त्यातील मेसॉन ड फिएरो हा सर्वात मोठा लोहयुक्त उल्कापाषाण होता. कॅम्पो डेल सिएलो उल्कांमुळे काही छोटी विवरेही तयार झाली. त्यात ७८ बाय ६५ मीटरचे विवर सर्वात मोठे आहे. उल्कापाषाणांचे वजन मोजण्यासाठी काही शास्त्रीय पद्धती आहेत. त्यांची खनिजरचना व कालावधीही सांगता येतो. आतापर्यंत सापडलेला सर्वात मोठा उल्कापाषाण हा होबा नावाचा असून, त्याचे वजन ६० टन होते; तर तो नामिबियातील एका शेतात पडला होता. ८० हजार वर्षांपूर्वी तो जेथे पडला तेथेच तो अजून आहे. ॲस्ट्रॉनॉमी असोसिएशन ऑफ चॅको या संस्थेने अलीकडेच एक मोठा उल्कापाषाण शोधला असून, तो १९६७ मध्ये सापडलेल्या ३७ टनांच्या उल्कापाषाणापेक्षा मोठा आहे. आतापर्यंत दुसरा मोठा उल्कापाषाण कोणता याबाबत वाद आहेत. अर्जेंटिनात जगातील तीन मोठ्या उल्कापाषाणांपैकी दोन आहेत.

## मधुमेहाच्या रुग्णांसाठी किवी फळ गुणकारी




भारताला सध्या 'मधुमेहाची जागतिक राजधानी' असेच म्हटले जाते. आपल्या देशात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मधुमेह झाला असेल, तर तुम्हाला कोणत्याही गोष्टीचे सेवन करताना काळजी घेण्याची गरज असते. अशा परिस्थितीत तुम्ही किवीला तुमच्या आहारात समाविष्ट करू शकता. तुमच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे, असे आहारतज्ज्ञ सांगतात. यामध्ये कमी ग्लायसेमिक निर्देशांक आहे आणि यामुळे इतर अन्नपदार्थांमधून ग्लुकोज शोषण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांना याचा खूप फायदा होऊ शकतो. किवीचा ग्लायसेमिक इंडेक्स स्कोअर सुमारे ५० आहे आणि त्यामुळे तुम्हाला त्याच्या सेवनामुळे रक्तातील साखर वाढण्याची समस्या भेडसावत नाही. कमी 'जीआय' अन्नपदार्थ रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात.

किवीचे हे काही फायदे...

**व्हिटॅमिन सी समृद्ध –** किवी हे व्हिटॅमिन सीने समृद्ध असलेले फळ आहे. यात ॲंटिऑक्सिडेंट गुणधर्म आहेत, जे ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये ही समस्या खूप सामान्य आहे. ज्यामुळे केवळ हृदयविकारच नाही, तर मज्जातंतूंनाही नुकसान होऊ शकते. व्हिटॅमिन सी मुळे तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.


**उच्च फायबर –** किवीमध्ये विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे किवीच्या सेवनाने रक्तातील साखरेचे शोषण कमी होते. किवी पचनासाठी देखील फायदेशीर आहे आणि बद्धकोष्ठता आणि इतर पाचन तंत्राशी संबंधित समस्या टाळण्यास मदत करते.

**कमी कर्बोदके –** फळांमध्ये कार्बोहायड्रेट मुबलक प्रमाणात आढळतात. पण, इतर फळांच्या तुलनेत किवीमध्ये कमी कर्बोदके असतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. जर तुम्हाला तुमच्या रक्तातील साखरेची काळजी न करता फळांचा आस्वाद घ्यायचा असेल, तर किवीचे सेवन जरूर करावे, असे तज्ज्ञ सांगतात.

**वजन कमी करण्यास उपयुक्त –** किवीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि कॅलरीज कमी असल्याने मधुमेहाच्या रुग्णांना त्यांचे वजन कमी करायचे असेल किंवा ते टिकवून ठेवायचे असेल, तर किवीला आपल्या आहाराचा भाग बनवा. तुमचे वजन नियंत्रित करून ते रक्तातील साखरेची पातळी कमी करतील.

## लेसरद्वारे बनणार नवे ग्राफिन सर्किट

ग्राफिनवर लेसर प्रक्रिया करून त्याचा वापर कमी किमतीच्या कागदावर आधारित असलेल्या इलेक्ट्रॉनिक्समध्ये करता येऊ शकेल. याबाबतच्या संशोधनात एका भारतीय वैज्ञानिकाचाही समावेश आहे. नवीन लेसर तंत्रज्ञानामुळे ग्राफिन सर्किटस्ची निर्मिती शक्य आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. ग्राफिन हा बहुगुणी रासायनिक पदार्थ असून, तो विद्युत व उष्णता यांचा वाहक आहे. तो मजबूत व स्थिर असून, त्याचे पदार्थविज्ञानातील गुणधर्म प्रत्यक्ष वापरात आणले जाणार आहेत.



इंकजेट प्रिंटरच्या मदतीने बहुस्तरीय ग्राफिनवर सर्किट तयार करता येते, त्यात इलेक्ट्रोड्सचाही वापर असतो. त्यामुळे लवचिक व परिधेय इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करता येतात. आताच्या तंत्रज्ञानात यामध्ये काही अडचणी आहेत. त्यात विद्युत वहनशीलता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी वेगळ्या उपाययोजना कराव्या लागतात. त्यासाठी जास्त तापमान व वेगळी रसायने लागतात. त्यात प्लास्टिक फिल्म्स व कागदाचा वापर केला जातो. आयोवा स्टेट विद्यापीठातील सहायक प्राध्यापक जोनाथन क्लॉसेन व संशोधक विद्यार्थी सुप्रेम दास यांनी लेसरच्या मदतीने ग्राफिनवर सर्किटस्? काढण्याचे तंत्र विकसित केले आहे. इंकजेट प्रिंटिंगने सर्ट काढता येतात व त्यात पल्सड लेसर पद्धतीने कागद, बहुवारिक किंवा इतर पदार्थांची हानी न करता विद्युतवहनशीलता वाढवता येते. इंकजेट प्रिंटेड ग्राफिनचा वापर संवहनशील पदार्थ म्हणून करता येतो हे यात दाखवून दिले आहे, असे क्लॉसेन यांनी सांगितले. यात जैविक संवेदक, ऊर्जा साठवण प्रणाली, विद्युत वाहक घटक तसेच कागदावर आधारित इलेक्ट्रॉनिक सर्किट्सची निर्मिती शक्य होणार आहे. यात ग्राफिन ऑक्साईडचे रूपांतर ग्राफिनमध्ये केले जाते. ग्राफिनचे पापुद्रे एकत्र चिकटवून विद्युत वहनशीलता हजारो पटींनी वाढवली जाते. दास यांच्या मते उच्च ऊर्जा फोटॉन ग्राफिनची हानी करीत नाहीत. लेसरने त्याचे त्रिमिती व सपाट पृष्ठभाग तयार करता येतात. त्रिमिती भाग हे पाकळ्यांसारखे असतात. रासायनिक व जैविक संवेदकांसाठी हे तंत्रज्ञान उपयोगी आहे.

## वाचनकौशल्यासाठी द्या पोषक आहार

आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी पोषक आहार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. विशेषतः लहान मुलांच्या वाढीसाठीही पोषक आहाराचे महत्त्व मोठे आहे. मुलांची बुद्धिमत्ता, आकलनशक्ती यावरही असा आहार परिणाम करीत असतो. आरोग्यदायी अन्नपदार्थ सेवनाने मुलांचे वाचन कौशल्य वाढू शकते, असे संशोधकांनी म्हटलेले आहे.

शाळेच्या पहिल्या तीन वर्षांत मुलांना चांगला आहार दिला, तर त्यांचे वाचनकौशल्य सुधारते, असा त्यांचा दावा आहे. फिनलंडमधील जावस्कल्या विद्यापीठ व इस्टर्न फिनलंड विद्यापीठ या संस्थांतील वैज्ञानिकांनी सहा ते आठ वयोगटातील १६१ मुलांची पाहणी केली असता, त्यांना पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्यात आहारामुळे सुधारणा दिसून आली. यात त्या मुलांनी केलेल्या आहाराच्या टिप्पणीचा वापर करण्यात आला. त्यात काही प्रमाणित चाचण्या वापरण्यात आल्या. बाल्टिक सागरी भोजन व फिनीश पोषण आहार यांची शिफारस त्यात करण्यात आली आहे. मुलांना भाज्या, फळे, बेरी, मासे, पूर्ण अन्नधान्ये व असंपृक्त मेद, शर्करायुक्त पदार्थ दिले तर ते आरोग्यास चांगले मानले जातात. ज्यांच्या आहारात हे पदार्थ नसतात त्यांच्या वाचनकौशल्यावर परिणाम होतो.



या अभ्यासात असे दिसून आले की, दुसरी व तिसरीच्या मुलांमधील वाचनकौशल्ये त्यामुळे वाढली. त्यांची पहिलीतील वाचनकौशल्ये काहीही असली तरी त्यांच्यात ही सुधारणा दिसून आली आहे. आरोग्यवर्धक आहारामुळे पहिल्या इयत्तेपासून वाचनकौशल्ये सुधारतात. ज्यांचा आहार चांगला नसतो त्यांची कौशल्ये फार चांगली असत नाहीत. सामाजिक-आर्थिक स्थिती, शारीरिक हालचाली, शारीरिक तंदुरुस्ती हे घटकही यात महत्त्वाचे ठरतात, असे संशोधक एरो हापला यांनी सांगितले.

# फुले दांम्पत्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे २७ जुलै रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन

### प्रा. माणिक विधाते यांची माहिती; फुले, शाहू, आंबेडकर विचारांच्या सर्व समाजाला बरोबर घेऊन होणार कार्यक्रम नियोजित पुतळ्याचे डिजाईन समाजबांधवांपुढे सादर

नगर – शहरातील माळीवाडा वेस येथे उभारण्यात येणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या एकत्रित पुतळा उभारणीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले कृती समितीच्या वतीने झालेल्या बैठकीत सदर पुतळा उभारणीच्या कामाचे भूमिपूजन २७ जुलै रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संध्याकाळी ५ वाजता होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. तर हा कार्यक्रम फक्त माळी समाजापुरता मर्यादीत न ठेवता फुले, शाहू, आंबेडकर विचारांच्या सर्व समाजाला बरोबर घेऊन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर नियोजित पुतळ्याचे आकर्षक डिजाईन समाजबांधवांपुढे सादर करण्यात आले. गाडळकर मळा येथील शिवशंकर लॉन्स येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.


माळीवाडा वेस येथे उभारण्यात येणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या एकत्रित पुतळा उभारणीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले कृती समितीच्या वतीने आयोजिलेल्या बैठकीत उपस्थित पदाधिकारी. (छाया – लहू दळवी)

यावेळी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी नगरसेवक ॲड. धनंजय जाधव, कृती समितीचे सचिव अशोक कानडे, ज्ञानेश्वर रासकर, बाजार समितीचे संचालक संतोष म्हस्के, श्री विशाल गणेश देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, बाळासाहेब आगरकर, डॉ. रणजीत सत्रे, मनोज गाडळकर, दत्ता गाडळकर, फुले ब्रिगेडचे दीपक खेडकर, सावता परिषदेचे गणेश बनकर, जालिंदर बोरुडे, प्रकाश इवळे, अनिल इवळे, राजेंद्र पडोळे, विनोद पुंड, रमेश चिपाडे, कॅप्टन सुधीर पुंड, ब्रिजेश ताठे, डॉ. केतन गोरे, रामदास फुले, अमोल भांबरकर, रेणुका पुंड, कल्याणी गाडळकर, श्रद्धा जाधव आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा एकत्रित पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी आमदार संग्राम जगताप यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. ही वास्तविक स्व. अरुणकाका जगताप यांची संकल्पना होती. सर्व समाजाच्या माध्यमातून पुतळ्यासाठी कृती समिती स्थापन करण्यात आल्याने वाद निर्माण न होता, सर्वानुमते निर्णय घेतले जात आहे. १३ नोव्हेंबर २०२२ पासून महापालिकेत माळी समाजाची बैठक घेऊन पूर्णकृती पुतळा बसविण्याची मागणी करण्यात आली होती. यानंतर कृती समितीची स्थापना, महासभेत ठराव, महापालिकेच्या माध्यमातून शासनाकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्याची त्यांनी माहिती दिली. तर २७ जुलै रोजी ना. अजित पवार यांच्या हस्ते संध्याकाळी ५ वाजता पुतळा उभारणी व सुशोभीकरणाच्या कामाचे भूमीपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व आजी–माजी महापौर, नगरसेवक, माजी नगराध्यक्ष व सर्व राजकीय व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना आमंत्रित केले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

किशोर डागवाले म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून या पूर्णाकृती पुतळ्याचे काम पूर्णत्वास जात आहे. कृती समितीने देखील उत्तम प्रकारे पाठपुरावा करुन काम अंतिम टप्प्यात आनले आहे. फुले दांम्पत्यांचा हा भव्य–दिव्य पुतळा शहराची शोभा वाढवून सर्व समाजाला प्रेरक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंडितराव खरपुडे यांनी या फुले दांम्पत्यांच्या पुतळा उभारणीच्या माध्यमातून शहरातील माळी समाज एकत्र आल्याचे स्पष्ट केले. ज्ञानेश्वर रासकर यांनी माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांचे स्वप्न या पुतळ्याच्या माध्यमातून साकारले जात असल्याचे सांगितले.

यावेळी अशोक कानडे, अशोकराव आगरकर, प्रकाश इवळे, बजरंग भुतारे, माजी नगरसेवक ॲड. धनंजय जाधव, डॉ. रणजीत सत्रे, अनिल बोरुडे, संतोष म्हस्के यांनी आपल्या भावना व्यक्त करुन विविध सूचना मांडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले.

# पुणे मनपा शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष रवि चौधरी यांना 'डॉक्टरेट' पदवी प्रदान



नगर – मुंबई येथे रेडिसन ब्ल्यू हॉटेल येथे झालेल्या थेम्स इंटरनॅशनलयुनिव्हर्सिटी पॅरिस (फ्रान्स) 'डॉक्टोरल मॉनिटरिंग बोर्ड'च्या 'इंडो–युरोपियन समिट ॲण्ड अवॉर्ड –२०२५'तर्फे आयोजित कार्यक्रमात पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष व करीयर महोत्सवाचे आयोजक रवि चौधरी यांना 'शिक्षण व्यवस्थापन' क्षेत्रातील योगदानाबद्दल 'डॉक्टरेट' पदवी प्रदान करण्यात आली. गेली २४ वर्षे डॉ. रवि चौधरी पालक व विद्यार्थांना करीयरच्या संधीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी करियर महोत्सवाचे आयोजन करतात. तसेच शिक्षण मंडळाच्या माध्यमातूनही विद्यार्थांना नौकरी व व्यवसायाच्या दृष्टीने उपयोगी पडतील असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. त्याशिवाय मॉरिशस मधील ५० हून अधिक मूळ निवासी मराठी विद्यार्थांना पुण्यामध्ये उच्च शिक्षणासाठी विशेष सहयोग दिला.


रवि चौधरी यांना 'शिक्षण व्यवस्थापन' क्षेत्रातील योगदानाबद्दल 'डॉक्टरेट' पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ.रवि पुंडलिक चौधरी हे मूळचे नगरचे रहिवासी आहेत व दादा चौधरी हे माळीवाडा येथे पोस्टमास्टर होते.

यावेळी प्रिन्स लर्निंग सेंटर मलेशियाचे डायरेक्टर डॉ. नासीर अफिज्राद्दीन, विद्यार्थी समुपदेशक डॉ. राखी काळेसकर, थेम्स इंटरनॅशनल युनिव्हसिर्टीच्या व्हाइस चॅन्सलर (एशिया) डॉ. प्रियदर्शी नायक, 'टीटीआययू'चे ॲक्डेमिक डॉ. हरन्स लालकैला, प्रा. राकेश मित्तल, डॉ. अमित बागवे, डॉ. अब्बास लोखंडवाला, डॉ. शरद जोशी, डॉ. संदीप बागडे, डॉ. राजेश शिंदे आणि शिक्षण क्षेत्रातील लोक उपस्थित होते.


कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल व सिध्दी ॲडव्हर्टायझिंगच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्दी शाकाहारी टिफिन बनवा स्पर्धेत विजेत्यांना पारितोषिक वितरण करताना आरटीओ वाहन निरीक्षक माधवी वाघ आदी.

# कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल व सिध्दी ॲडस् आयोजित शाकाहारी टिफिन बनवा स्पर्धेत मंगला चोपडा प्रथम

नगर – कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल व सिध्दी ॲडव्हर्टायझिंगच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्दी शाकाहारी टिफिन बनवा स्पर्धेत ५० पेक्षा अधिक महिलांनी सहभाग घेतला.

मंगला चोपडा यांच्या कडधान्याचे कटलेट या टिफिन रेसिपीला प्रथम क्रमांक मिळाला. किर्ती कर्नावट यांच्या छोले पनीर टॅकोजला द्वितीय, उषा शेठिया यांच्या मोरींगो पराठा रेसिपीला तृतीय तर कावेरी मोहिते यांच्या कॉर्न भेळ रेसिपीला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. बक्षिस वितरण समारंभ आरटीओ वाहन निरीक्षक माधवी वाघ यांच्या हस्ते झाला. यावेळी मयुरी सावदेकर, स्वाती गांधी, राहुल सावदेकर, राशी सावदेकर आदी उपस्थित होते.

माधवी वाघ म्हणाल्या की, प्रत्येक आईसमोर मुलांना दररोज डब्यात काय द्यायचे हा प्रश्न असतो. सध्याच्या काळात जंक फूडचे प्रमाण वाढले आहे. अशावेळी घरीच रूचकर आणि मुलांच्या वाढीस उपयुक्त अशी पौष्टिक रेसिपी तयार करता आली पाहिजे. स्पर्धेमुळे प्रत्येकीने कल्पकता दाखवत चांगल्या हेल्दी रेसिपी सादर केल्या. ५० हून अधिक रेसिपी आल्याने प्रत्येकीला इतर महिलांनी केलेल्या रेसिपीचीही माहिती झाली. आताच्या काळाशी सुसंगत स्पर्धा घेण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे सांगत वाघ यांनी महिलांना रोड सेफ्टी तसेच वाहन चालवताना घ्यावयाची काळजी, नियमावली याबाबत मार्गदर्शन केले.

राशी सावदेकर यांनी आभार मानले.

# होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज २१ ते २६ जुलैपर्यंत मेंदु व थॉयराईड विकारावर तपासणी व उपचार शिबीर

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर येथे २१ ते २६ जुलै पर्यंत सकाळी ९.३० ते ५.०० या वेळेत मेंदुविकार व थॉयराईड विकार या विकारांवार मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली.

सदर शिबीरामध्ये, मेंद्रुविकार व थॉयराईड विकार या आजारावर सखोल चिकित्सा करुन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत होमिओपॅथिक औषधे दिली जातील.

सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार डॉ. सुनिल पवार, डॉ. वाकळे राजेंद्र, डॉ. वारे सोनाली, डॉ. स्नेहल सोलनकर हे करणार असुन आजार बरा होईपर्यंत सर्वांना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करुन या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल.

अहमदनगर व अहमदनगर परिसरातील सर्व गरजु व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर.एस, अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ डॉ. स्नेहल सोलनकर यांनी केले आहे.

# केडगावमध्ये २ तृतीय पंथीयांकडून महिलेला बेदम मारहाण; गुन्हा दाखल

नगर – रस्त्याने पायी जाणाऱ्या महिलेस दुचाकीने धक्का दिल्याने याचा जाब विचारला असता दुचाकीवरील २ तृतीयपंथीयांनी त्या महिलेस शिवीगाळ करीत बेदम मारहाण केल्याची घटना केडगावच्या भुषणनगर परिसरात १५ जुलै रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली.

या बाबत दिक्षा विलास पाटील (वय ३०, रा. भूषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या एका कंपनीत कार्यरत आहेत. १५ जुलै रोजी सायंकाळी काम संपवून फिर्यादी या त्यांची सहकारी पायल चव्हाण यांच्यासह रंगोली हॉटेल येथे कंपनीच्या बसमधून उतरल्या. त्यानंतर त्या दोघी पायी झेंडा चौकाकडे जात असताना एका मोपेडवरुन आलेल्या २ तृतियपंथीय व्यक्तींनी फिर्यादी यांना उजव्या बाजूने धक्का दिला. यावर फिर्यादी यांनी त्यांना गाडी नीट चालवण्याबाबत विचारणा केली असता, त्या दोघांनी त्यांच्या सोबत वाद घालण्यास सुरुवात केली.

पुढे जात असतानाही त्यांनी पाठलाग करत पुन्हा शाब्दिक वाद केला. यातूनच एकाने फिर्यादी यांचे केस पकडून मारहाण केली, तर दुसऱ्याने लाथाबुक्क्यांनी मारले. एका तृतीयपंथीयाने त्यांच्या नाकावर जोरदार ठोसा मारला, ज्यामुळे त्यांचे नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले आणि रक्तस्राव सुरू झाला. फिर्यादी यांनी आरडाओरड करताच स्थानिक नागरिकांनी धाव घेत त्या दोघांपासून त्यांना सोडवले व जखमी दिक्षा पाटील यांना रुग्णालयात उपचारासाठी रुग्णालयात नेले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दिक्षा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोन तृतीय पंथीयाविरुद्ध बी एन एस कलम ११७ (२), ११५(२), ३५२, ३ (५) प्रमाणे मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अहिल्यानगरमध्ये २२ जुलै रोजी पंडित दीनदयाल रोजगार मेळावा

नगर – जिल्ह्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी २२ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरुडगावरोड, अहिल्यानगर येथे पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

मेळाव्यात जिल्ह्यातील १५ ते २० नामांकित कंपन्यांचे उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखती घेऊन उमेदवारांची निवड करणार आहेत.

एचएससी, सर्व शाखेतील पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा आणि डिग्रीधारक उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://forms.gle/CDMcrNKWzDNpbrL9 या लिंकवर आपली नोंदणी करून पात्रतेनुसार अर्ज करावा.

माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४१–२९९५७३५, रोजगार मेळावा समन्वयक वसीमखान पठाण (९४०९५५५४६५), संतोष वाघ (८८३०२१३९७६), बद्रीनाथ आव्हाड (९४२०७२५२८०) आणि योगेश झांजे (९५८८४०८८९०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोबाईल टॉवरच्या ५ बॅट्यांची चोरी; गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील वाटेफळ शिवारात असलेल्या मोबाईल टॉवर ५ बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना १४ जुलै रोजी रात्री घडली. या बाबत सिक्युरिटी सुपरवायझर परमेश्वर सुधाकर राख (वय ३९, रा.निबोडी, ता.नगर)यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे, १४ जुलै रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास मोबाईल टॉवरच्या २० हजार रुपये किमतीच्या ५ बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या. त्यामुळे परिसरातील मोबाईल नेटवर्क सेवा विस्कळीत झाली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार खरमाळे हे करीत आहेत.

# रात्रीच्या अंधारात संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन तोंडाला रुमाल बांधून संशयित्या फिरणाऱ्या दोघांना एमआयडीसी पोलिसांनी पकडले. ही कारवाई एमआयडीसी येथील दूध डेअरी जवळ,आणी जिमखाना ग्राउंड जवळ १६ जुलै रोजी रात्री करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलीस एमआयडीसी हद्दीत रात्री गस्त करीत असताना दूध डेअरी जवळ, टपरीच्या आडोशाला अंधारात संशयितरित्या फिरणाऱ्या मुकेशकुमार गिरीधारीराज राजपूत (वय २५, रा. विखे पाटील हॉस्पीटल, एमआयडीसी) पकडले. तर दुसऱ्या कारवाईत एमआयडीसी येथील जिमखाना ग्राउंड जवळ अंधारात काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या हालचाल करणाऱ्या सागर विश्वास भाकरे (रा. नागापूर, एमआयडीसी) यास पकडण्यात आले. याप्रकरणी दोघांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांची नोंद केली असून तपास पोलीस हवालदार शिंदे आणि महिला पोलीस नाईक वंदना काळे करीत आहेत.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय**: श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय** : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी नमूद केलेले कर्जदार यांनी टुहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी होम फायनान्स लिमिटेडचे असे म्हणणे आहे की, हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात. म्हणून या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम – १३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्तावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या जाहिर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३ (२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार, सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रक्कमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदारांचे नाव व पत्ता | सुरक्षित मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचनेनुसार दिनांक व थकबाकी रक्कम रुपयात |
|---|---|---|
| लोन क्रमांक SLPHAMDR0000449<br>श्री.बाळासाहेब पोटघन (कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : खंडाळा, ता. नगर, दौंड हायवे, अहमदनगर शहर, अहमदनगर, महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता: आदर्श कॉम्प्लेक्स, तळमजला, सर्व्हे क्रमांक ५९/२ ब +६०+६१, प्लॉट क्रमांक १८५. दुकान क्रमांक ८, मौजे सावेडी, सावेडी रोड अहमदनगर–४१४००३<br>श्रीमती सविता बाळासाहेब पोटघन (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : खंडाळा, ता. नगर, दौंड हायवे, अहमदनगर शहर, अहमदनगर, महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता: आदर्श कॉम्प्लेक्स, ग्राउंड फ्लोअर, सर्व्हे क्रमांक ५९/२ब+६०+६१, प्लॉट क्रमांक १८५, दुकान क्रमांक ८, मौजे सावेडी, सावेडी रोड अहमदनगर–४१४००३<br>श्री. अजिंक्य बाळासाहेब पोटघन (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: खंडाळा, ता. नगर, दौंड हायवे, अहमदनगर शहर, अहमदनगर, महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता : आदर्श कॉम्प्लेक्स, ग्राउंड फ्लोअर,सर्व्हे क्रमांक ५९/२ब+६०+६१, प्लॉट क्रमांक १८५. दुकान क्रमांक ८, मौजे सावेडी, सावेडी रोड अहमदनगर–४१४००३<br>कर्ज रक्कम – रु.१०,६९,२७४/–<br>लोन क्रमांक SLPHAMDR0000449<br>एनपीए तारीख ०४/०७/२०२५ | सर्व तुकडा आणि पार्सल ती मालमत्ता म्हणजे– यामध्ये प्रॉपर्टी बेअरिंग ग्राउंड फ्लोअर शॉप नंबर ८, त्याचे क्षेत्रफळ, १३.८४ चौ.मी. एमटीआरएस' आदर्श कॉम्प्लेक्स पैकी प्लॉट क्रमांक १८५ वर योग्यरित्या बांधले गेले होते, त्याच्या एकूण क्षेत्रकळातील एटीएम. ४१०.०० चौ. मीटर, सर्वेक्षण क्रमांक ५९/२ ब/६०/६१ पैकी सावेडी येथे एएमसीच्या हद्दीत स्थित आहे. अहमदनगर ता. नगर जिल्हा. अहमदनगर<br>पूर्वेकडे : दुकान क्रमांक ९<br>दक्षिणेकडे : रस्ता<br>पश्चिमेकडे : दूकान क्रमांक ७<br>उत्तरेकडे : मोकळी जागा | मागणी सूचना दिनांक ११/०७/२०२५<br>कर्ज खाते क्रमांक SLPHMOR0000449 च्या संदर्भानुसार, आतापर्यंत नमूद केलेल्या पुढील व्याजासह आणि अनुषंगिक खर्च, खर्च इत्यादींसह, दिनांक ०९–०७–२०२५ रोजीची मागणी सूचना रक्कम – रु. ११,८७,२८३/–<br>(रुपये अकरा लाख सत्त्याऐंशी हजार दोनशे त्रेऐंशी फक्त). |
| लोन क्रमांक SLPHPNEP0000414<br>श्री.जाधव रमेश श्रीराम (कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : रेणुका निवास, आखेगाव रोड, एमएसईबी ऑफिसजवळ, श्रीकृष्णनगर, शेवगाव, अहमदनगर एमएसईबी, महाराष्ट्र–४१४५०२<br>मालमत्तेचा पत्ता: गट क्र.७२४, प्लॉट क्र. १४, मालमत्ता क्र. झेड–१ डब्ल्यू १००६७९१, ग्रामपंचायत क्र.५२६५, आखतवाडे, अहमदनगर.महाराष्ट्र–४१४५०२<br>श्रीमती सविता रमेश जाधव (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : रेणुका निवास, आखेगाव रोड, एमएसईबी ऑफिसजवळ, श्रीकृष्णनगर शेवगाव, अहमदनगर एमएसईबी, महाराष्ट्र–४१४५०२<br>मालमत्तेचा पत्ता: गट क्र.७२४, प्लॉट क्र. १४, मालमत्ता क्र. झेड–१ डब्ल्यू १००६७९१ ग्रामपंचायत क्र.५२६५, आखतवाडे, अहमदनगर. महाराष्ट्र–४१४५०२<br>श्री.श्रीराम सोमा जाधव (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : रेणुका निवास, आखेगाव रोड, एमएसईबी ऑफिसजवळ, श्रीकृष्णनगर शेवगाव, अहमदनगर एमएसईबी, महाराष्ट्र–४१४५०२, मालमत्तेचा पत्ता: गट क्र.७२४, प्लॉट क्र. १४, मालमत्ता क्र. झेड–१ डब्ल्यू १००६७९१, ग्रामपंचायत क्र.५२६५, आखतवाडे, अहमदनगर. महाराष्ट्र–४१४५०२<br>कर्जाची रक्कम रु.–४८,९९,३६३/–<br>लोन क्रमांक SLPHPNEP0000414<br>एनपीए तारीख ०४/०७/२०२५ | सर्व तुकडा आणि पार्सल ती मालमत्ता म्हणजे प्लॉट क्रमांक १४, क्षेत्रफळ १६०.०० चौरस मीटर, गट क्रमांक ७२४/१ भाग, शेवगाव, ता. शेवगाव, जिल्हा : अहमदनगर येथून.<br>पूर्वकडे : रस्ता<br>दक्षिणकडे : प्लॉट क्र.१३<br>पश्चिमेकडे : प्लॉट क्रमांक ११<br>उत्तरेकडे : प्लॉट क्र. १५ | मागणी सूचना दिनांक ११/०७/२०२५<br>मागणी सूचना रक्कम – दिनांक ०९–०७–२०२५ रोजी रु. ५६,०५,५२१/–<br>(रुपये छप्पन लाख पाच हजार पाचशे एकवीस फक्त)<br>कर्ज खाते क्रमांक SLPHPNEP0000414, आतापर्यंत नमूद केलेले पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, खर्च इ. |
| लोन क्र : SHLHAMDR0000143<br>श्री. सचिन बन्सी पाथरे (कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : २३१/२–३ सी विजय लाइन, नगर–पाथर्डी रोड, डीएमआर गेट समोर,अहमदनगर, महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता: साई सिद्धी अपार्टमेंट, स्टिल्ट ग्राउंड फ्लोअर, प्लॉट क्र.७, फ्लॅट क्र.१ स.नं. ४/७ अ/१, नायकू नगर, ए/पी भिंगार, अहमदनगर ४१४००२<br>श्रीमती मीरा सचिन पाथरे (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : २३१/२–३ सी विजय लाइन, नगर–पाथर्डी रोड, डीएमआर गेट समोर,अहमदनगर, महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता: साई सिद्धी अपार्टमेंट, स्टिल्ट ग्राउंड फ्लोअर, प्लॉट क्र.७, फ्लॅट क्र.१ स.नं. ४/७ अ/१, नायकू नगर, ए/पी भिंगार, अहमदनगर ४१४००२<br>कर्जाची रक्कम – रु.११,२९,७४९/–<br>लोन क्र : SHLHAMDR0000143<br>एनपीए तारीख ०६/०७/२०२५ | सर्व तुकडा आणि पार्सल ती मालमत्ता म्हणजे अहमदनगर येथील भिंगार गावातील सर्व्हे क्रमांक ४/७ अ/१ मधील ४३०.०२ चौरस मीटरच्या भूखंड क्रमांक ७ वर गट नंबर १ बांधलेले क्षेत्रफळ ४३.१८ चौरस मीटर, बाल्कनी क्षेत्रफळ ५.९४ चौरस मीटर, अगणित क्षेत्रफळ ५.०५ चौ. मीटर, साई सिद्धी रेसिडेन्सी बाहेरील स्टिल्ट ग्राउंड फ्लोअर. ही मालमत्ता मोकळी मालमत्ता आहे आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध आहे. – पूर्वेकडे; मार्जिन आणि ९ मीटर रस्ता,<br>दक्षिणेकडे : फ्लॅट क्रमांक ०२<br>पश्चिमेकडे : जिना आणि फ्लॅट क्रमांक ०४<br>उत्तर : बाजुचा कडा आणि आकाशात उघडा. | मागणी सूचना दिनांक–११/०७/२०२५<br>कर्ज खाते क्रमांकाच्या संदर्भात दिनांक ०८–०७–२०२५ रोजीची मागणी सूचना रक्कम – रु.१०,०८,८१३/– (रुपये दहा लाख आठ हजार आठशे तेरा फक्त), कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR0000143 आतापर्यंत नमूद केलेल्या पुढील व्याजासह आणि अनुषंगिक खर्च, खर्च इ. |
| लोन क्र : SBTHAMDR0000215<br>लोन क्र : SILHAMDR0000216<br>श्री. सागर चेलाजी धिवर (कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: रो हाऊस नंबर ए ५, अमेना कॉलनी १, नागरदेवळे, अमेना कॉलनी, अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता : बेलेश्वर पार्क फेज १६, सर्व्हे क्रमाक २३२/१ ब/२ ब/२/२ ए/१ भाग प्लॉट क्रमांक १, रो हाऊस क्रमांक ए ५, अमेना कॉलनी, अहमदनगर कॅम्प नागरदेवळे अहमदनगर – ४१४००२<br>चेलाजी खिराजी धिवर (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: रो हाऊस नंबर ए ५, अमेना कॉलनी १, नागरदेवळे, अमेना कॉलनी, अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता : बेलेश्वर पार्क फेज १६, सर्व्हे क्रमाक २३२/१ब/२ब/२/२ ए/१ भाग प्लॉट क्रमांक १, रो हाऊस क्रमांक ए ५, अमेना कॉलनी, अहमदनगर कॅम्प नागरदेवळे अहमदनगर – ४३६४००२<br>श्री.किरण चेलाजी धिवर (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: रो हाऊस नंबर ए ५, अमेना कॉलनी १, नागरदेवळे,अमेना कॉलनी, अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता : बेलेश्वर पार्क फेज १६, सर्व्हे क्रमाक २३२/१ब/२ब/२/२ ए/१ भाग प्लॉट क्रमांक १, रो हाऊस क्रमांक ए ५, अमेना कॉलनी, अहमदनगर कॅम्प नागरदेवळे अहमदनगर–४१४००२<br>श्रीमती आशा चेराजी धिवर (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: रो हाऊस नंबर ए ५, अमेना कॉलनी १, नागरदेवळे,अमेना कॉलनी,अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१<br>मालमत्तेचा पत्ता : बेलेश्वर पार्क फेज १६, सर्व्हे क्रमाक २३२/१ब/२ब/२/२ ए/१ भाग प्लॉट क्रमांक १, रो हाऊस क्रमांक ए ५, अमेना कॉलनी, अहमदनगर कॅम्प नागरदेवळे अहमदनगर – ४१४००२<br>कर्जाची रक्कम – रु. ८,५५,६१२/– आणि रु. ३,७६,२१७/–<br>लोन क्र : SBTHAMDR0000215 आणि<br>लोन क्र : SILHAMDR0000216<br>एनपीए दिनांक : ०६/०७/२०२५ | सर्व तुकडा आणि पार्सल म्हणजे, रो हाऊस क्रमांक ए–५ क्षेत्रफळ ३७.८४ चौ.मी., तळमजला बांधलेला क्षेत्रफळ २५.२९ चौ.मी., पहिला मजला बांधलेला. क्षेत्रफळ २५.२९ चौ.मी. एकूण बांधलेला क्षेत्रफळ ५०.५८ चौ.मी. बेलेश्वर पार्क, फेज १६ रो– हाऊसिंग स्कीमच्या बाजुच्या ४११.५२ चौ.मी. वर बांधलेल्या विंग ए मधून, जी रितसर बांधण्यात आली होती. प्लॉट क्रमांक १ वर एकूण २०७५.०० चौ. मीटर, सर्वेक्षण क्रमांक २३२/१ ब/२ब/२/२ ए/१ पैकी, अहमदनगर जिल्हा परिषद अहमदनगरच्या हद्दीतील नागरदेवळे गावाचा भाग, अंतर्गत :<br>पूर्व : ५ मीटर रस्ता<br>पश्चिम: रो हाऊस क्रमांक ए–४<br>दक्षिण : ॲमिनिटी स्पेस<br>उत्तर: रो हाऊस क्रमांक ए–६ | मागणी सुचना दिनांक ११/०७/२०२५<br>कर्ज खाते क्रमांकाच्या संदर्भात दिनांक ०८–०७–२०२५ रोजीची मागणी सूचना रक्कम – रु. ८,४१,३७२/– (रुपये आठ लाख एकेचाळीस हजार तीनशे बहात्तर फक्त दिनांक ०८–०७.२०२५ रोजी कर्ज खाते क्रमांक SBTHAMDR0000215 आणि रु.४,४९,३११/– (रुपये चार लाख एकोणपन्नास हजार तीनशे अकरा फक्त) च्या संदर्भात कर्ज खाते क्रमांक SILHAMDR0000216, आतापर्यंत नमूद केलेले पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च इ. |
| लोन क्र. SLPHAMDR0000634<br>श्री.सुरेश गुरुनाथ सांगापूरकर (कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: ओंकारनगर, शाहूनगर, प्लॉट नं. १२०, केडगाव विठ्ठल–रुक्मिणी मंदिराजवळ, अहमदनगर शहर, अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१,<br>मालमत्तेचा पत्ता: सर्व्हे. क्रमांक ५००, १ केडगाव, 'पीएल क्रमांक १२०, केडगाव अहमदनगर–४१४००५<br>श्रीमती सुजाता सुरेश सांगापूरकर (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: ओंकारनगर, शाहूनगर, प्लॉट नं. १२०, केडगाव विठ्ठल–रुक्मिणी मंदिराजवळ, अहमदनगर शहर, अहदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१,<br>मालमत्तेचा पत्ता: सर्व्हे. क्रमांक ५००, १ केडगाव, 'पीएल क्रमांक १२०, केडगाव अहमदनगर–४१४००५<br>श्रीमती शशिकला गुरुनाथ सांगापूरकर (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: ओंकार नगर, शाहू नगर, प्लॉट नं. १२०, केडगाव विठ्ठल–रुक्मिणी मंदिराजवळ, अहमदनगर शहर, अहमदनगर महाराष्ट्र भारत–४१४००१,<br>मालमत्तेचा पत्ता : सर्व्हे. क्रमांक ५००, १ केडगाव, 'पीएल क्रमांक १२०, केडगाव अहमदनगर–४१४००५<br>कर्ज रक्कम – रु २६,३३,५३४/–<br>लोन क्र. SLPHAMDR0000634<br>एनपीए दि.०४/०७/२०२५ | त्यामध्ये प्लॉट क्रमांक १२० असलेली मालमत्ता, सर्व्हे क्र. ५००/१ (त्यावरील बांधकामासह) पासून बांधलेली १८०.०० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली मालमत्ता, केडगाव, अहमदनगर यांचा समावेश आहे.<br>पूर्व : श्री. जाधव यांचे घर (सर्व्हे. क्र.४९९/१/४)<br>पश्चिम : १५ फूट बिटमेन रोड<br>उत्तर : श्री. कर्डिले यांचे घर (प्लॉट क्रमांक १२१)<br>दक्षिण : ओपन प्लॉट (प्लॉट ११९) | मागणी सूचना दिनांक ११/०७/२०२५<br>कर्जखाते क्रमांकाच्या संदर्भात दिनांक ०९–०७–२०२५ रोजीची मागणी सुचना रक्कम – रु. २९,३१,२०१/– (रुपये एकोणतीस लाख एकतीस हजार दोनशे एक फक्त). कर्ज खाते क्रमांक SLPHAMDR0000634 आणि आतापर्यंत नमूद केलेले पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते की, ही नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम १३ (१३) नुसार सदर वर्णीत मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री, भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : १८.०७.२०२५

सही/– अधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

